महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरूद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन : मुंबईसह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, जालना, नाशिक

MHCrimeTimes MAHCrimeTimes 9803386748 maharashtracrimetimes@gmail.com

www.maharashtracrimetimes.com epaper.maharashtracrimetimes.com

मूल्य ₹ २/-

● संपादक : राकेश शंकर गोरे

● वर्ष : १७ अंक : ०७ पृष्ठ : ८ मुंबई, मंगळवार १९ मे २०२६ ते सोमवार २५ मे २०२६ ● POSTAL REG.NO. MCN/157/2026-2028 ● PRGI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## आरोग्य सेवा दर्जेदार करा, सरकारी रुग्णालयांची प्रतिमा सुधारा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रशासनाला निर्देश !

**मुंबई (विशाल कारंडे) : राज्यातील नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे. राज्यातील आरोग्यसेवा परिणामकारक, दर्जेदार आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करत प्रधानमंत्री आयुष्मान आरोग्य मंदिर, क्रिटिकल केअर ब्लॉक आणि प्रयोगशाळांच्या उभारणीची कामे निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण करावीत,असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सामाजिक क्षेत्रातील योजनांच्या पाठपुराव्यासाठी मुख्यमंत्री वॉररुमची स्थापना करण्यात आली आहे. या वॉर रुम अंतर्गत आरोग्य विभागाच्या केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांचा आढावा मुख्यमंत्री यांनी घेतला.**

केंद्र व राज्य शासनाच्या प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत पायाभूत आरोग्य सुविधा बळकटीकरण, प्रधानमंत्री आयुष्मान भारत हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशन, नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची उभारणी एचपीव्ही लसीकरण मोहीम आदींसह विविध प्रलंबित कामांचा यावेळी आढावा घेण्यात आला. मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात शहरी आणि ग्रामीण भागात दर्जेदार व सहज उपलब्ध आरोग्य सेवा निर्माण करण्यावर शासनाचा विशेष भर आहे. यासाठी तमिळनाडूसह विविध राज्यांच्या आरोग्य व्यवस्थेचा अभ्यास करून महाराष्ट्रासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. केंद्र शासनाकडून मिळणारा निधी



निर्धारित वेळेत खर्च होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आयुष्मान आरोग्य मंदिर उभारणे, क्रिटिकल केअर ब्लॉक व एकात्मिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा यांची कामे वेगाने करण्यासाठी लक्ष घालावे. सुरुवातीच्या काळात कामांमध्ये विलंब होत होता; मात्र आता जिल्ह्यांची कामगिरी समाधानकारक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी नमूद केले. काही जिल्ह्यांची प्रगती तुलनेने कमी असली तरी सर्व जिल्ह्यांनी आता निश्चित केलेल्या वेळापत्रकात काम पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रीत करावे. प्रलंबित प्रकल्पांमध्ये विभागांमधील समन्वयाचा अभाव राहू नये, यासाठी शासन म्हणून सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कामे पूर्ण करावीत, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आरोग्य क्षेत्राला कमी प्राधान्याचे क्षेत्र समजण्याची मानसिकता बदलण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. शासनाच्या आरोग्य सुविधांमध्ये गुणवत्ता, स्वच्छता आणि चांगले ब्रँडिंग असावे. शासकीय दवाखाने म्हणजे अस्वच्छ किंवा निकृष्ट ही नागरिकांची धारणा बदलण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. मॉड्युलर तंत्रज्ञानामुळे दर्जेदार आणि वेळेत काम शक्य होत असल्याने अधिकाऱ्यांनी कल्पकतेने काम करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. पुण्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये करण्यात आलेल्या सकारात्मक बदलाचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अशा चांगल्या उपक्रमांचा इतर ठिकाणीही अवलंब व्हायला हवा. नागरिकांना शासकीय आरोग्य व्यवस्थेमध्ये गुणवत्ता जाणवली पाहिजे, यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या कामाची जबाबदारी स्वीकारून लक्ष घालावे.

▶ पान २ वर

## संक्षिप्त



### स्विगी, झोमॅटोसह डिलिव्हरी सेवा महागणार?

**मुंबई :** पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे खाद्यपदार्थ वितरण तसेच अन्य पार्सल सेवा महागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गिग अँड प्लॅटफॉर्म सर्व्हिस वर्कर्स युनियनने ॲप-आधारित कामगारांसाठी प्रति किलोमीटर सेवा दरात २० रुपयांची वाढ करण्याची मागणी केली आहे. इंधन दरवाढीमुळे डिलिव्हरी करणाऱ्या कामगारांच्या रोजच्या उत्पन्नावर मोठा परिणाम होत असून, अनेक कामगारांना दिवसाला मिळणाऱ्या २०० ते ३०० रुपयांच्या कमाईत घट झाल्याचे सांगितले जात आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रतिलिटर किमान तीन रुपयांची वाढ झाल्याने लाखो गिग कामगारांच्या आर्थिक अडचणी आणखी वाढल्या आहेत. अन्नपदार्थांसह किराणा आणि विविध कंपन्यांची उत्पादने घरपोच पोहोचवणाऱ्या कामगारांवर या दरवाढीचा थेट परिणाम होत आहे. गेल्या चार वर्षांतील ही पहिली मोठी इंधन दरवाढ मानली जात असून, देशातील सुमारे १ कोटी २० लाख गिग आणि अन्य कामगारांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गिग कामगारांच्या संघटनेने इशारा दिला आहे की, इंधन, एलपीजी आणि वाहनांच्या देखभाल खर्चात सातत्याने वाढ होत असताना कंपन्यांनी कामगारांच्या वेतन रचनेत बदल केला नाही, तर मोठ्या प्रमाणात कामगारांना हे काम सोडावे लागू शकते. Swiggy, Zomato आणि Blinkit यांसारख्या कंपन्यांनी वितरण सेवा आणि वाहतूक कामगारांसाठी प्रति किलोमीटर दरात वाढ करावी, अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली आहे.

### पुरस्कार विजेत्यांसाठी एसटीचा १००% मोफत प्रवास!

**पुणे :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शासकीय पुरस्कार विजेत्यांना महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळ (एमएसआरटीसी) अर्थात एसटी महामंडळाच्या बसेसमधून १०० टक्के मोफत प्रवासाची विशेष सवलत दिली जाते. या योजनेअंतर्गत पात्र पुरस्कार विजेत्यांना वार्षिक मोफत प्रवास पास दिला जातो, ज्याच्या माध्यमातून त्यांना राज्यभर वर्षभर विनामूल्य प्रवास करता येतो. या योजनेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे पुरस्कार विजेत्यासोबत एका सहप्रवाशालाही मोफत प्रवासाची सुविधा मिळते. साध्या आणि निमआराम बसेससोबतच शिवनेरी, शिवाई यांसारख्या उच्च दर्जाच्या बससेवांमधूनही हा लाभ घेता येतो. मात्र, हा पास दरवर्षी नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. शासनाच्या या उपक्रमामुळे सामाजिक, क्रीडा आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला जात असून, त्यांच्या प्रवासाचा आर्थिक भारही कमी होत आहे. या योजनेचा लाभ अनेक राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना दिला जातो. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार विजेते, आदिवासी सेवक पुरस्कार विजेते, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार विजेते, शिवछत्रपती, अर्जुन, द्रोणाचार्य आणि दादाजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त खेळाडू तसेच दिव्यांग गुणवंत कामगार पुरस्कार विजेते यांचा समावेश आहे. या मोफत प्रवास पाससाठी संबंधित व्यक्तींना जवळच्या एसटी आगारात अर्ज करावा लागतो. अर्जासोबत अधिकृत पुरस्कार प्रमाणपत्र, शासन आदेश किंवा राजपत्राची प्रत, सरकारी ओळखपत्र आणि पासपोर्ट आकाराचे फोटो सादर करणे आवश्यक असते.

## मुंबईत ‘मराठी पाटी’ सक्तीचा शेवटचा इशारा

### महिनाभरात अंमलबजावणी न केल्यास BMC करणार मोठी कारवाई

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** मुंबईतील दुकाने आणि आस्थापनांवर मराठी देवनागरी लिपीतील नामफलक लावण्याबाबत मुंबई महानगरपालिकेने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. ज्या दुकानांवर अद्याप मराठी पाट्या नाहीत, त्यांना एका महिन्याचा ‘अल्टिमेटम’ देण्यात आला असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे परवाने रद्द करण्यापर्यंतची कारवाई करण्याचा इशारा उपमहापौर संजय घाडी यांनी दिला.पालिकेच्या मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत घाडी बोलत होते. यावेळी विधी समितीच्या अध्यक्षा



दीक्षा कारकर, विविध पक्षांचे नगरसेवक आणि परवाना विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मुंबईत सुमारे ९ लाख दुकाने व आस्थापना आहेत, मात्र आतापर्यंत केवळ सव्वा ते दीड लाख आस्थापनांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

▶ पान २ वर

## राजधानीत सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आठवड्यातून दोन दिवस ‘वर्क फ्रॉम होम’ लागू

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** दिल्ली सरकारने इंधन बचत आणि वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत आठवड्यातून दोन दिवस ‘वर्क फ्रॉम होम’ धोरण लागू करण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सांगितले की, देशातील सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानंतर दिल्ली सरकारने ‘मेरा भारत, मेरा योगदान’ ही विशेष मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत सरकारी कार्यालयांमध्ये दर आठवड्याला दोन दिवस घरून काम करण्याची पद्धत राबवली जाईल, तर खासगी क्षेत्रासाठीही स्वतंत्र मार्गदर्शक




सूचना जारी केल्या जाणार आहेत. हे निर्णय १५ मेपासून लागू करण्यात आले असून, ही मोहीम पुढील ९० दिवस सुरू राहणार आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सांगितले की, सरकारी वाहनांचा वापर कमी करण्यासाठी अधिकाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या पेट्रोल कोट्यात २० टक्क्यांची कपात करण्यात आली आहे.

▶ पान २ वर

### दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे प्रमुख निर्णय

- ५० टक्के बैठका ऑनलाइन घेतल्या जातील.
- कामगार विभागात ‘सिंगल-विंडो हेल्प डेस्क’ स्थापन केला जाईल.
- परदेश प्रवास करणे टाळावे. दिल्ली सरकारचा कोणताही मंत्री किंवा अधिकारी पुढील एका वर्षासाठी परदेश प्रवास करणार नाही.
- पुढील तीन महिन्यांसाठी कोणतेही मोठे सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत.
- दिल्लीसाठी एक विशेष प्रवास योजना तयार केली जाईल.
- ‘Made in India’ ला प्रोत्साहन देण्यासाठी, सर्व शॉपिंग मॉल्समध्ये ‘Made in India’ साठी समर्पित विशेष विभाग उभारले जातील.
- दिल्ली सरकार भारतात उत्पादित वस्तूंना प्राधान्य देईल.
- सर्व सरकारी कार्यालयांमधील वातानुकूलन यंत्रे (ACs) २४ ते २६ अंश सेल्सिअस तापमानावर चालवली जातील.
- विजेचा अपव्यय रोखण्यासाठी ‘मास्टर स्विच’ प्रणाली बसवण्यात येईल.

## सरकारी विमानाचा वापर आता मुख्यमंत्र्यांच्या मंजुरीनंतरच! – राज्य सरकार

### सरकारचा काटकसरीकडे कल; ऑनलाइन बैठका आणि ईव्ही वापरावर भर

**मुंबई (राकेश गायकवाड) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी केलेल्या काटकसरीच्या आवाहनाचे पडसाद आता महाराष्ट्र प्रशासनात स्पष्टपणे उमटू लागले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील मंत्र्यांच्या सरकारी विमान वापरावर कडक निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला असून, आता कोणत्याही मंत्र्याला मुख्यमंत्र्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय सरकारी विमानाने प्रवास करता येणार नाही. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या नव्या नियमांची माहिती देताना सांगितले की, हा निर्णय



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार घेण्यात आला आहे. त्यांनी सांगितले की, ते स्वतः वर्षातून केवळ चार ते पाच वेळाच अत्यंत तातडीच्या कामासाठी विमानाचा वापर करतात. मुख्यमंत्री अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांमुळे विमानाने प्रवास करतात, मात्र आता इतर सर्व मंत्र्यांसाठी परवानगी घेणे अनिवार्य असेल. बावनकुळे यांनी हेही स्पष्ट केले की, ते अधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष बोलावण्याऐवजी बहुतांश बैठका ऑनलाइन माध्यमातूनच घेतात. मुख्यमंत्र्यांच्या या भूमिकेनंतर मत्स्य विकास व बंदर मंत्री नितेश राणे यांनी आपल्या विभागात तत्काळ बदलांची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यांनी विभागातील सर्व बैठका आता ऑनलाइन घेण्याचे आदेश दिले.

▶ पान २ वर

### पंतप्रधानांचा ‘७ कलमी’ बचत मंत्र :

१. इंधन बचत : पेट्रोल-डिझेलचा वापर किमान करा.
२. सुवर्ण मर्यादा : सध्या सोन्याची खरेदी टाळा.
३. वर्क फ्रॉम होम : शक्य असेल तिथे घरून कामाला प्राधान्य द्या.
४. स्वदेशी : भारतीय उत्पादनांचा वापर वाढवा.
५. पर्यटन : परदेश प्रवास टाळून देशांतर्गत पर्यटनाला महत्त्व द्या.
६. नैसर्गिक शेती : खतांची आयात कमी करण्यासाठी नैसर्गिक शेतीकडे वळा.
७. खाद्यतेल : आयातीवरील खर्च वाचवण्यासाठी खाद्यतेलाचा मर्यादित वापर करा.

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा एल्गार

**पुणे (शकिल शेख) :** महाराष्ट्रामध्ये वाढत्या बुवाबाजी आणि अंधश्रद्धेच्या घटनांना आळा घालण्यासाठी आता अखिल भारतीय महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने कंबर कसली असून ‘वृक्ष तिथे छाया... बुवा तिथे बाया’ हे हटके अभियान राज्यभर राबवण्यास सुरुवात केली आहे. संस्थेचे संस्थापक प्रा .श्याम मानव यांनी राज्यात ‘वृक्ष तिथे छाया... बुवा तिथे बाया’ हे विशेष जनजागृती अभियान सुरू केले आहे. या अभियानाद्वारे ते ठिकठिकाणी जाऊन भोंदूगिरी आणि त्यामागे लपलेली गुन्हेगारी उघड करत आहेत. याचाच एक भाग म्हणून पुण्यातही टिळक स्मारक मंदिर येथे प्राध्यापक श्याम मानव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांच्या शोषणाला आळा घालण्यात यंत्रणा अपयशी ठरत आहे. राज्यात वाढणारी अंधश्रद्धा ही केवळ वैचारिक नसून ती एक सामाजिक विकृती बनत चालली आहे. ‘ असे मत त्यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत मांडले.

अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती

**‘वृक्ष तिथे छाया, बुवा तिथे बाया’ अभियान सुरू**

▶ पान २ वर

## पुण्याच्या वैभवात मानाचा तुरा

### दगडूशेठ गणपतीला ‘अ’ वर्ग पर्यटन दर्जा!

**पुणे (अभिजीत येरल्लू) :** पुण्याचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभव मानल्या जाणाऱ्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर च्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. राज्य सरकारने या ऐतिहासिक आणि लोकप्रिय गणपती संस्थानाला ‘अ’ वर्ग पर्यटन क्षेत्राचा अधिकृत दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पुण्यातील धार्मिक पर्यटनाला नवी दिशा मिळणार असून मंदिर परिसराच्या विकासाला मोठी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वरून या निर्णयाची अधिकृत घोषणा करत आनंद व्यक्त केला. “॥ गणपती बाप्पा मोरयाऽऽऽ ॥ पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती संस्थानाला ‘अ’ वर्ग पर्यटन क्षेत्राचा दर्जा



देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे परिसराचा तीर्थक्षेत्र आणि पर्यटनाच्या दृष्टीने सर्वांगीण विकास करणे अधिक सोपे होणार आहे,” असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. या निर्णयासाठी गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा सुरू होता. अखेर यश मिळाल्याने पुणेकर आणि गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

▶ पान २ वर

## ‘महाराष्ट्र ॲग्री हॅकेथॉन’ची राज्यस्तरीय घोषणा; पहिला पुरस्कार अजित पवारांच्या नावाने!

**पुणे (अकिल शेख) :** कृषी क्षेत्रातील संशोधन, तंत्रज्ञान आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी पुढील वर्षापासून राज्यस्तरावर ‘महाराष्ट्र ॲग्री हॅकेथॉन’ आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. पुणे ॲग्री हॅकेथॉनच्या धर्तीवर ही राज्यव्यापी स्पर्धा होणार असून, स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाणार आहे. कृषी विभागाच्या




वतीने कृषी महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या ‘पुणे ॲग्री हॅकेथॉन’च्या समारोप आणि पारितोषिक वितरण समारंभात मुख्यमंत्री बोलत होते. या वेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी तसेच विविध कृषी विद्यापीठांचे कुलगुरू आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक संशोधन आणि नवकल्पनांची मोठी गरज आहे. कृषी नवसंकल्पना स्पर्धेसारखे उपक्रम भविष्यातील कृषी व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी पुणे ॲग्री हॅकेथॉनमधील निवडक १८ नवकल्पनांना पुढील टप्प्यात विशेष मदत आणि मार्गदर्शन दिले जाईल, अशी घोषणा केली. त्यापैकी किमान १२ प्रकल्प प्रत्यक्ष बाजारात आणण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करणार असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेची सुरुवात झाली आहे.

▶ पान २ वर

संपादकीय

संपादक : राकेश शंकर गोरे



# पाणीटंचाईचे संकट गंभीर; जिल्ह्यात धरण तरी लोकांचे मरण

ठाणे जिल्ह्यात सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढल्यामुळे पाणीटंचाईचे संकट गंभीर होत चालले आहे. मे महिना मध्यावर आला असताना आता टंचाईची तीव्र झाली आहे. ठाणे शहर तलावांचे मानले जाते तर जिल्हा धरणांचा मानला जातो, याच ठाणे जिल्ह्यातून मुंबई, ठाणे शहर परिसराला पाणी पुरवले जाते. मात्र ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात तसेच शहापूरसारख्या दुर्गम भागासह उल्हासनगर, भिवंडी आणि शहर परिसरातही पुरेसे पाणी उपलब्ध नाही. ठाणे जिल्ह्यात चार महापालिका क्षेत्रे असतानाही या भागांना पाण्याची स्वतंत्र व्यवस्था अद्याप होऊ शकलेली नाही. बदलापूरचे बारवी, अंबरनाथच्या तलावक्षेत्रातून ठाणे शहराची तहान भागवली जाते. परंतु हे जलसाठेही आटत आले आहेत. यंदा वेळेआधी मान्सून दाखल होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. परंतु वेळेआधी दाखल होऊन त्यानंतर महिनाभर तातडीने परांगदा होणारा मान्सूनचा अनुभवही आहेच. जुलैच्या मध्यावर किंवा शेवटच्या आठवड्यात नियमित मान्सूला सुरुवात होते, असे मानले गेल्यास ठाणे जिल्ह्यातील धरणक्षेत्रातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने हा चिंतेचा विषय आहे. यंदाही वेळेवर दाखल होऊन मान्सूनने हुलकावणी दिल्यास चिंता वाढणार आहे. इंधनदरवाढ, अवकाळीमुळे शेतकरी आधीच मेटाकुटीला आला असताना पावसाने ओढ दिल्यास किंवा अवेळी विश्रांती घेतल्यास सिंचनचा प्रश्न गंभीर होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी आणि शेतीला पुन्हा उभारी मिळण्यासाठी उत्तम मान्सूनची गरज आहे.मुंबई क्राईम

ठाणे जिल्ह्यातील पाणीवाटपाचा प्रश्न आहेच. आधी पिण्यासाठी पुरवठा, त्यानंतर सिंचन आणि त्यानंतर गरज असेल तरच बांधकामे, उद्योगासाठी पाणी या अनुक्रमातून पाणीवाटप व्हायला हवे. मात्र हा अनुक्रम पाळला जातोय का? हा खरा प्रश्न आहे. मोठ्या जलाशयातील शेतीसाठीचे पाणी बांधकामे आणि उद्योगांसाठी वळवल्याचा आरोप अनेकदा करण्यात येतो. संपूर्ण टँकरमुक्तीचे स्वप्न अद्यापही पूर्ण झालेले नाही. ठाणे जिल्ह्याला आणि औद्योगिक क्षेत्राला मोठा पाणीपुरवठा करणाऱ्या बारवी धरणातील पाणीसाठा बाष्पीभवन आणि वाढत्या वापरामुळे ३५ टक्क्यांपर्यंत खालावला आहे. यंदा मान्सून 'अपेक्षित वेळेपेक्षा उशिरा' येण्याची शक्यता एल् निनोच्या प्रभावामुळे वर्तवण्यात आल्याने, जलसंपदा विभागाने हा उपलब्ध पाणीसाठा ३१ जुलैऐवजी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पुरवण्याचे नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत. ठाणे लघु पाटबंधारे विभागाने पाणी बचतीसाठी मे महिन्यापासून सर्व संबंधित प्राधिकरणांना आठवड्यातून एक दिवस २४ तास पाणीपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय काही भागात ७ टक्के ते १० टक्के पाणीकपात लागू आहे. मुंबई महापालिकेकडून ठाणे, भिवंडी आणि आसपासच्या ज्या भागांना पाणीपुरवठा होतो, तिथेही १५ मेपासून १० टक्के पाणीकपात लागू आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात वाहने धुण्यावर १० जूनपर्यंत बंदी आहे. यासोबत बेकायदा टॅप मारून, पंप लावून होणारी पाणीचोरी रोखण्याची गरज आहे, यातील फौजदारी गुन्ह्यांची तरतूद कागदावरच राहात कामा नये.

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागात प्रशासनाकडून टँकर्स सुरू झाले आहेत. त्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळण्याची जबाबदारी नागरिकांचीही आहे. सरकार, पालिकांकडे बोट दाखवून आपली जबाबदारी ढकलण्याची वेळ केव्हाच निघून गेली आहे. ठाणे शहरात उच्चभ्रू मानल्या जाणाऱ्या घोडबंदर भागातील सोसायट्यांमध्येही टँकर मागावावे लागत आहेत. ठाणे परिसर तसेच महापालिका क्षेत्रात उंचच उंच निवासी बांधकामे वेगाने उभारली जात आहेत. सोबतच उद्योग आणि विविध सरकारी प्रकल्पही उभारले जात असताना त्यांना लागणाऱ्या वाढीव पाण्याचे नियोजन कसे केले जाणार आहे? याविषयी पुरेशी स्पष्टता नाही. नागरी विकासात प्राथमिक गरज असलेल्या पाणीपुरवठ्याकडेच दुर्लक्ष झाले आहे. पाणीटंचाईच्या गंभीर मुद्द्यावर केवळ पाणीकपातीची मलमपट्टी उपयोगाची नाही. भिवंडीत उद्योग, शेती आणि निवासी क्षेत्रात पाण्यासाठी तीव्र संघर्ष सुरू आहे. हंडाभर पाण्यासाठी कुटुंबाला ऐन उन्हाळ्यात दूरदूर पायपीट करावी लागत आहे. पालिकांकडून पाणीकपात झाल्याने ठाणे परिसरात उपलब्ध पाण्याचा दाबही कमी झाला आहे. शहापुरातील भातसा, तानसा आणि वैतरणा धरणक्षेत्रात दरवर्षीप्रमाणे यंदाही पाणीटंचाई कायम आहे. शहापुरात टँकर्समधून सुमारे २९ गावे आणि १०९ पाड्यांची तहान भागवली जात आहे. परिस्थिती आणखी कठीण झाल्याने स्थानिक प्रशासनाने अतिरिक्त टँकरची मागणी जिल्हा प्रशासनाकडे नोंदवली आहे. मे महिन्याच्या अखेरपर्यंत ठाणे जिल्ह्यात पाण्याची मागणीही वाढत जाणार आहे. एक दिवस टँकर येतो आणि पुढचे आठ दिवस गाव कोरडे, अशी भीषण स्थिती काही दुर्गम पाड्यांमध्ये आहे. पाण्यासाठी ग्रामस्थांना डोंगराळ भागात पायपीट करावी लागत आहे. पाणीटंचाईची नैसर्गिक, भौगोलिक कारणे आपल्या हाती नाहीत. परंतु मागील २० ते २५ वर्षापासून वेगाने नागरीकरण होताना भविष्यातील आवश्यक जलधोरणांचा विचार न केल्याचे हे फलित आहे. पाणीचोरी, गळती रोखण्यासाठी आपल्याकडे सक्षम यंत्रणा अजूनही नाही. ठाणे जिल्ह्यातील पाणीटंचाईमागे मानवी कारणे प्रामुख्याने आहेत. कमी पर्ज्यन्यमान किंवा वाढता उष्मा ही कारणे त्यामागे नाहीत.

# मुलांनो मैदानात या......



आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटीच्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, मोबाईल, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे. **- श्याम ठाणेदार**

पान १ वरून...

## पुण्याच्या वैभवात मानाचा तुरा

या नव्या दर्जामुळे मंदिर परिसराचा शासकीय निधीतून व्यापक विकास होणार आहे. भाविकांसाठी अधिक चांगल्या सुविधा, आधुनिक सुरक्षा व्यवस्था आणि वाहतूक नियोजनावर विशेष भर दिला जाणार आहे. गणेशोत्सव काळात होणारी मोठी गर्दी लक्षात घेऊन पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यात येणार असून, देश-विदेशातील पर्यटक आणि गणेशभक्तांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या निर्णयाचा सकारात्मक परिणाम पुण्यातील स्थानिक बाजारपेठ, हॉटेल व्यवसाय, वाहतूक सेवा आणि रोजगाराच्या संधींवरही होणार आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही या निर्णयाचे स्वागत करत आनंद व्यक्त केला. "दगडूशेठ गणपती संस्थानाला 'अ' दर्जा मिळणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. यामुळे पुण्याच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेला अधिक समृद्धी लाभेल आणि भाविकांसाठी उत्तम सुविधा निर्माण करण्यास मदत होईल," असे त्या म्हणाल्या.

## 'महाराष्ट्र ॲग्री हॅकेथॉन'ची राज्यस्तरीय...

बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे अत्यावश्यक झाले आहे. या स्पर्धेमुळे तरुण संशोधक, विद्यार्थी आणि स्टार्टअप्सना शेतीसाठी नवे तंत्रज्ञान विकसित करण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. राज्य सरकारच्या या उपक्रमामुळे कृषी क्षेत्रातील नवकल्पनांना चालना मिळून शेतकऱ्यांसाठी आधुनिक आणि परिणामकारक उपाययोजना विकसित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**स्पर्धेतील विभागांनुसार विजेते :**

- मृदा आरोग्य व व्यवस्थापन
- विजेता : किसान साथी
- उपविजेता : नॅनो वीटा
- स्मार्ट जल व्यवस्थापन व स्वयंचलन
- विजेता : आयओएच अभियंता समूह
- उपविजेता : फार मोअर
- कृषी यांत्रिकीकरण (कृत्रिम बुद्धिमत्ता व यंत्रमानव तंत्रज्ञान)
- विजेता : एग्रीटेक नेक्सस
- उपविजेता : टीम व्हीएनएमकेव्ही
- कृषी प्रक्रिया व मूल्य साखळी
- विजेता : विन विन बाईट्स
- उपविजेता : सिल्कस्कॅन इनोव्हेटर्स
- अक्षय ऊर्जा व कृषी कचरा व्यवस्थापन
- विजेता : प्रोटो फीड्स
- उपविजेता : इको एक्सट्रॅक्ट
- पीक संरक्षण व कीड व्यवस्थापन
- विजेता : स्मार्ट बायो डिलिव्हरी
- उपविजेता : कृषी नेत्र
- हवामान अनुकूल व डिजिटल शेती
- विजेता : डीप अँग बॉट
- उपविजेता : मॉडर्न व्हिलेज फ्यूचर इनोव्हेशन्स
- भूस्थानिक व भौगोलिक माहिती प्रणाली आधारित पीक सर्वेक्षण व्यवस्था
- विजेता : क्रॉप जेन एआय
- उपविजेता : ग्रीन माइंड्स
- स्मार्ट कृषी प्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता
- विजेता : ई-पिक ऑडिट एआय
- उपविजेता : कृषी प्रबंध

## सरकारी विमानाचा वापर आता...

असून, इंधन बचतीसाठी पेट्रोल आणि डिझेल वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांचा अधिक वापर करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. जागतिक स्तरावर इंधन आणि विविध वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे भारताच्या परकीय चलन साठ्यावर ताण वाढत आहे. भारत तेल, गॅस आणि सोने यांसारख्या वस्तूंची आयात डॉलरमध्ये करत असल्याने डॉलरचा साठा टिकवून ठेवणे आणि रुपयाचे मूल्य स्थिर राखणे महत्त्वाचे बनले आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य सरकार अनावश्यक खर्च कमी करण्यासाठी काटकसरीची धोरणे अधिक प्रभावीपणे राबवत असल्याचे दिसून येत आहे.

## मुंबईत 'मराठी पाटी' सक्तीचा शेवटचा इशारा

उर्वरित सर्वेक्षणाचे काम तातडीने पूर्ण करून १५ दिवसांत त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. मोठ्या आस्थापनांवर प्रथम कारवाई या मोहिमेत प्रथम पंचतारांकित हॉटेल्स, मोठ्या कंपन्यांची कॉर्पोरेट कार्यालये आणि सेलिब्रिटींच्या मालकीच्या आस्थापनांना लक्ष्य केले जाणार आहे. "मोठ्या व्यापाऱ्यांनी नियमांचे पालन केल्यास त्याचे अनुकरण सर्व स्तरावर होईल," असे मत उपमहापौरांनी व्यक्त केले. अनेक नामांकित हॉटेल्सना यापूर्वीच नोटिसा धाडण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) अधिनियम २०२२ नुसार प्रत्येक आस्थापनाला मराठी नामफलक लावणे बंधनकारक आहे. प्रशासनाने पुढील १५ दिवसांत अशा दुकानांची यादी तयार करावी, ज्यांनी अद्याप बदल केलेले नाहीत. त्यानंतरच्या १५ दिवसांत दंड आकारणे आणि थेट व्यापार परवाना रद्द करण्याची प्रक्रिया राबवली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मराठी पाट्यांच्या अंमलबजावणीत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही पालिकेची नजर असणार आहे. जून महिन्यात होणाऱ्या विधी समितीच्या बैठकीत २६ प्रभागांमधील (वॉर्ड) कारवाईचा आढावा घेतला जाईल. यावेळी संबंधित विभागाच्या निरीक्षकांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून कडक सूचना दिल्या जातील, असे दीक्षा कारकर यांनी सांगितले. "मराठी फलक हा मुंबईच्या अस्मितेचा विषय असून यात कोणतीही तडजोड केली जाणार नाही," असेही त्यांनी ठामपणे नमूद केले.

## राजधानीत सरकारी कर्मचाऱ्यांसाठी...

तसेच प्रत्येक सोमवारी 'मेट्रो सोमवार' पाळण्यात येणार असून, त्या दिवशी मंत्री आणि अधिकारी केवळ मेट्रोने प्रवास करतील. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि इंधन बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी दिल्ली सरकारने आणखी काही महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. सरकारी कार्यालयांच्या वेळांमध्ये बदल करण्यात आले असून, दिल्ली सरकारची कार्यालये सकाळी १०:३० ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सुरू राहतील, तर दिल्ली महानगरपालिका (MCD) कार्यालयांची वेळ सकाळी ८:३० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असेल. विद्यापीठांना प्रात्यक्षिक नसलेले वर्ग ऑनलाइन घेण्याचे आवाहन करण्यात आले असून, न्यायालयांनाही ऑनलाइन सुनावण्यांचा पर्याय वापरण्याची विनंती करण्यात आली आहे. नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस 'नो व्हेईकल डे' पाळावा, असेही आवाहन सरकारने केले आहे. पुढील सहा महिन्यांसाठी कोणतीही नवीन सरकारी वाहने खरेदी न करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, वाहतूक भत्त्यात १० टक्क्यांनी वाढ करण्याची घोषणाही करण्यात आली आहे. व्यापाऱ्यांना मालवाहतुकीसाठी ट्रकऐवजी रेल्वेचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले असून, या उपाययोजनांमुळे इंधन बचत आणि पर्यावरण संवर्धनाला मोठी मदत होईल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे।

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा एल्गार

राज्यात सध्या बुवाबाजी आणि अंधश्रद्धेच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली असून, याला राज्याचे मुख्यमंत्री आणि राज्य सरकारचे धोरण जबाबदार आहे, असाही आरोप श्याम मानव यांनी केला आहे. शिवाय जादूटोणा विरोधी कायद्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सरकारकडून सात संस्थांना १ कोटी ७७ लाख ७८ हजार रुपये निधी दिला असून, या निधीचे वाटप बेकायदेशीर आहे. तसेच सरकार कायदा करण्यासाठी चालढकलपणा करते आहे, अशी टीका त्यांनी पत्रकार परिषदेत केली. प्रा. श्याम मानव म्हणाले की, नाशिकमध्ये स्वयंघोषित बाबा अशोक खरात याला सत्ताधाऱ्यांचा वरदहस्त असल्यानेच त्याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केले आणि कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली आहे. खरातसारखे भोंदू बाबा हे एकट्याने मोठे होत नाहीत, जेव्हा मुख्यमंत्री किंवा जबाबदार मंत्री स्वत: ज्योतिषी किंवा बाबांच्या दरबारी जातात, तेव्हा समाजातील सामान्य माणसाचा अशा भोंदूंवरचा विश्वास वाढतो. हेच आज राज्यात घडत आहे. महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी कायदा अस्तित्वात असूनही त्याची अंमलबजावणी करण्याऐवजी सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत आहे, अशी टीका मानव यांनी केली. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जबाबदार धरत, गृहमंत्रालय केवळ सोयीनुसार कारवाई करत आहे. जर अशोक खरातवर कारवाई होऊ शकते, तर बागेश्वर बाबा यांच्यासारख्या बाबांवर कारवाई का होत नाही? सरकार केवळ राजकीय हित पाहूनच कायदे राबवत आहे, असा सवाल त्यांनी केला.

## आरोग्य सेवा दर्जेदार करा, सरकारी...

वैद्यकीय महाविद्यालयांच्या उभारणीमधील अडचणी तातडीने दूर करून कामांना गती देण्याचे निर्देश देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, अधिकाऱ्यांनी बैठकीत दिलेल्या मुदतींची नोंद करण्यात आली आहे. पुढील वॉर रूम बैठकीत त्याचा आढावा घेतला जाणार असून अधिकाऱ्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करणे आवश्यक राहील. प्रश्न प्रलंबित ठेवू नका, पाठपुरावा वाढवा, असे स्पष्ट निर्देश देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, एखादा प्रश्न आपल्या स्तरावर सुटत नसेल तर विभाग प्रमुख, सचिव, मुख्य सचिव, मंत्री किंवा मुख्यमंत्री स्तरापर्यंत विषय मांडावा; मात्र काम पूर्ण होईपर्यंत शांत बसू नये. सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यास कोणतीही समस्या सुटू शकते, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी सर्व्हायकल कर्करोग प्रतिबंधासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या एचपीव्ही लसीकरण मोहिमेचाही आढावा घेण्यात आला. महाराष्ट्राला जवळपास दहा लाख मुलींच्या लसीकरणाचे उद्दिष्ट देण्यात आले असून हे उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. जिल्हास्तरावर पालकांची संमती घेऊन व्यापक जनजागृती मोहीम राबवावी आणि लक्ष्य वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. राज्यात नवीन तेरा वैद्यकीय महाविद्यालयांच्या उभारणीची कामे हाती घेण्यात आली आहेत. या महाविद्यालयांच्या उभारणीत येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून कामे वेगाने पूर्ण होतील, याकडे लक्ष देण्यात यावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता**
**मार्ग विकास विभाग क्र.४(सा.बां.) अंधेरी, मुंबई**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई नौरोजी, रोड,अंधेरी,(प) मुंबई-४०० ०५८**
E-mail- rd4andheri.ee@mahapwd.gov.in
**दुरध्वनी क्रमांक.०२२-२६२३१३११**

**ई- निविदा सुचना क्र.१ सन २०२६-२०२७**

महाराष्ट्र राज्यपालाच्या वतीने **कार्यकारी अभियता,मार्ग विकास विभाग क्र.४ मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी ({प),मुंबई-** ४०० ०५८ (दुरध्वनी /फॅक्स क्रमांक २६२३१३११/२६२३१५८७)महाराष्ट्र शासनाच्यासार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृतमुंबई उपनगर जिल्हा( पश्चिम उपनगरे ) **मजूर सहकारी संस्था मर्यादित,मुंबई यांच्या कडून खालील कामाकरीता** ब -१ नमुन्यातील निविदाई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी.
तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.अर्जदार मजूर सहकारी संस्था ज्या उपनगरातील संबधीत असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करु शकतात.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १ | मुंबई उपनगर जिल्हा, बोरीवली तालुका, चारकोप, डिंगेश्वर मंदिराकडील बाजू, येथील शासकीय मालकीच्या सी.टी.एस. क्रमांक ५५३, ३ ए/१ पै. भूखंडाला संरक्षक भिंतीचे बांधकाम. | रु.४२,३१,२७७/- |
| २ | मुंबई उपनगरजिल्हा, बोरीवली तालुका, चारकोप, डिंगेश्वर झोपडपट्टी बाजू, येथील शासकीय मालकीच्या सी.टी.एस. क्रमांक ५५३, ३ ए/१ पै. भूखंडाला संरक्षक भिंतीचे बांधकाम. | रु.४२,३१,२७७/- |

**ई-निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक **१९/०५/२०२६** @ १५:०० पासून दिनांक **०३/०६/२०२६** @ १७:०० पर्यंत. |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी | दिनांक **१९/०५/२०२६**@१५:०० पासून दिनांक **०३/०६/२०२६**@ १७:०० पर्यंत. |
| ३ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक **०५/०६/२०२६** स.१७:१५ वाजता (शक्य झाल्यास) कार्यकारी अभियंता, मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी , ,मुंबई-४०००५८ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५८.
कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र. का.अ.माविवि.क्र.४/ निविदा/ ३४४
कार्यकारी अभियंता,यांचे कार्यालय,
मार्ग विकास विभाग क्र. ४, प्रशासकीय इमारत,
३ रा मजला ,भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई नौरोजी मार्ग,
अंधेरी, मुंबई, ४०० ०५८.
दिनांक :-१३/०५/२०२६

कार्यकारी अभियंता,
मार्ग विकास विभाग क्र.४,
अंधेरी , मुंबई-५८

आरओसी - 2026-27/क्र-5/C८१२

**महाराष्ट्र शासन**
इलाख्रा शहर विभाग, (सा.बां.)
**ई -निविदा सुचना क्र १० सन २०२६-२०२७**

कार्यकारी अभियंता, इलाख्रा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थाकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाख्रा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | बाझार गेट पोलीस स्टेशन मुंबई येथील तळमजल्यावरील स्टाफ सिटींग अरेजमेंट येथे प्लास्टर, फ्लोरींग, दरवाजा, खिडक्या,टॉयलेट ब्लॉक येथे रंगकाम, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | ३८.५४ |
| २ | बाझार गेट पोलीस स्टेशन मुंबई येथील १मजल्यावरील डीसीपी ऑफिस झोन-१ येथे स्टाफ सिटींग अरेजमेंट प्लास्टर, फ्लोरींग, दरवाजा, खिडक्या,टॉयलेट ब्लॉक येथे रंगकाम, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | ३५.०० |
| ३ | बाझार गेट पोलीस स्टेशन मुंबई येथील २ मजल्यावरील स्टाफ सिटींग अरेजमेंट प्लास्टर, फ्लोरींग, दरवाजा, खिडक्या,टॉयलेट ब्लॉक येथे रंगकाम, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | ३१.३६ |
| ४ | मंत्रालय मुंबई विस्तार इमारत येथील रूम नं. ४०७ येथे मंत्री चेंबर, अँटी चेंबर, कॉन्फरन्स हॉल, पॅसेज इ. नुतनीकरण करणे. | १५.८८ |
| ५ | बाझार गेट पोलीस स्टेशन मुंबई येथील तळमजला ते २ मजल्यावरील पंप रुम, मीटर रुम येथे प्लास्टर, फ्लोरींग, डॅडो, दरवाजा, खिडक्या, टॉयलेट ब्लॉक येथे रंगकाम, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | १०.५३ |
| ६ | बाझार गेट पोलीस स्टेशन मुंबई येथील १मजल्यावरील डीसीपी ऑफिस झोन-१ इमारत येथे मंगलोरी छत, प्लॅंक सिलिंग, वॅल्ली गटर, स्टोन मॅसर्नी, वुडन रेलिंग, एचडीपीई टॅंक, वॉटरप्रुफिंग, वेस्ट पाईप लाईन येथे रंगकाम, प्लास्टर, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | ३९.६१ |
| ७ | बाझार गेट पोलीस स्टेशन मुंबई येथील तळमजला ते २ मजल्यावरील प्लास्टर, फ्लोरींग, दरवाजा, खिडक्या, हॅंड रेलिंग, ट्रेड, जिना, येथे रंगकाम, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | १८.८८ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. १३.५.२०२६ ते दि. २०.५.२०२६ पर्यंत.
ई-निविदा उघडणे - दि. २१.५.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता

निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ ४५२६
कार्यकारी अभियंता
इलाख्रा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ८/५/२०२६

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाख्रा शहर विभाग, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र-5/C७४१

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून झाडांची विशेष काळजी



**मुंबई (राकेश गायकवाड) :** वाढत्या तापमानाचा मुंबई महानगरातील वृक्षसंपदेवर प्रतिकूल परिणाम होऊ नये तसेच मुंबईकरांना गारवा मिळावा, या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून झाडांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. झाडांच्या मुळांना पुरेसे पाणी न मिळाल्यास ती कमकुवत होऊन झाडे उन्मळून पडण्याची शक्यता निर्माण होते. ही बाब लक्षात घेऊन झाडांसाठी असे पाणी पुरवून संजीवनी देण्यासाठी महानगरपालिकेने हा उपक्रम हाती घेतला आहे. पिण्यासाठी अयोग्य असलेले, परंतु झाडांसाठी पोषक असलेले पाणी यासाठी वापरण्यात येत आहे. सार्वजनिक ठिकाणांतील झाडांना महानगरपालिकेकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर, खासगी क्षेत्रातील झाडांसाठी संबंधित गृहनिर्माण संस्थांनी पाणीपुरवठा करावा, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे. अतिउष्णतेमुळे जमिनीतील ओलावा कमी होतो आणि झाडांवर ताण वाढतो. परिणामी, झाडांची मुळे कमकुवत होऊन जमिनीवरील पकड सैल पडण्याची शक्यता वाढते. तसेच झाडांच्या फांद्या कोरड्या व ठिसूळ होऊन तुटण्याचा धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेकडून झाडांना नियमित पाणी देण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत रस्ते स्वच्छता मोहिमेदरम्यान पाण्याच्या टँकरद्वारे झाडांना पाणी देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. जी दक्षिण विभागात केशवराव खाड्ये मार्ग तसेच सांताक्रुझ व जुहू परिसरात स्वच्छता अभियानासोबत झाडांना पाणी देण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली आहे. उद्यान विभागाकडूनही मुंबईतील विविध भागांत झाडांची निगा राखणे, आवश्यक ठिकाणी पाणीपुरवठा करणे तसेच झाडांच्या आरोग्याची पाहणी करणे, ही कामे सातत्याने सुरू आहेत. वृक्षतज्ज्ञांच्या मते, झाडांना वेळेवर पाणी मिळाल्यास त्यांच्या अंतर्गत पाणी वहन प्रक्रियेस मदत होते व उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी होतो. त्यामुळे फांद्या सुकणे, ठिसूळ होणे किंवा झाडांची स्थिरता कमी होणे यांसारख्या समस्या काही प्रमाणात टाळता येतात. उन्हाळ्यात झाडांचे जतन करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्यामुळे मुंबईकरांनी आपल्या परिसरातील तसेच गृहनिर्माण संस्थांच्या आवारातील झाडांना वेळोवेळी पाणी घालावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# ई – वॉर्डातील नागरी दस्तऐवजांचे 'व्हिजन एआय वॉल्ट' अंतर्गत होणार जतन

- जन्म - मृत्यू नोंदी, विवाह नोंदी यांसारखे जुने अभिलेख अवघ्या काही सेकंदात उपलब्ध होणार
- जुन्या अभिलेखांच्या सुरक्षित संवर्धनासमवेतच नागरिकांना आवश्यक कागदपत्रे अधिक जलद, अचूक आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध होणार
- अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांचा पुढाकार



**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ई प्रशासकीय विभागातील (वॉर्ड) जतन करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण नागरी दस्तऐवजांचे आता अत्याधुनिक 'व्हिजन एआय वॉल्ट' प्रणालीअंतर्गत डिजिटल जतन करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे जन्म - मृत्यू नोंदी, विवाह नोंदी यांसारख्या जुन्या अभिलेखांचे सुरक्षित संवर्धन होण्यास मदत होणार आहे. तसेच, नागरिकांना आवश्यक कागदपत्रे अधिक जलद, अचूक आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दस्तऐवजांचे वर्गीकरण, स्कॅनिंग आणि डिजिटल संग्रहण करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता व कार्यक्षमता वाढण्यासही हातभार लागणार आहे. ज्या प्रक्रियेसाठी नागरिकांना पूर्वी किमान ३० दिवस, तर काही प्रकरणांमध्ये तब्बल १ वर्ष ते दीड वर्षांची प्रतीक्षा करावी लागत होती, ती सेवा आता अवघ्या काही सेकंदात उपलब्ध होणार आहे, अशी माहिती अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांनी दिली.महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांनी महानगरपालिकेच्या विविध 'डेटाबेस'मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा समावेश करावा. डेटा - आधारित, पारदर्शक आणि नागरिक केंद्रित प्रशासकीय व्यवस्था उभारण्याच्या दिशेने महानगरपालिकेने वाटचाल सुरू करावी, असे निर्देश दिले आहेत. या अनुषंगाने, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांनी पुढाकार घेऊन ई - वॉर्डातील नागरी दस्तऐवजांचे कृत्रिम बुद्धिमत्ता तिजोरी (व्हिजन एआय वॉल्ट) अंतर्गत जतन करण्याचा पथदर्शी प्रकल्प हाती घेण्याचे निश्चित केले आहे. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांनी सांगितले की, ई प्रशासकीय विभागाकडे अनेक वर्षांपासूनचे अमूल्य नागरी दस्तऐवज जतन करण्यात आले आहेत. जन्म - मृत्यू नोंदी, विवाह नोंदी यांसारखे महत्त्वपूर्ण अभिलेख पावसाळा, दमट हवामान आणि काळाच्या कठोर परीक्षेलाही तोंड देत आजवर टिकून राहिले. मात्र, केवळ अस्तित्व टिकवून ठेवणे आता पुरेसे राहिले नव्हते. कालांतराने नोंदींवरील शाई फिकी पडू लागली, दस्तऐवजांची पाने ठिसूळ झाली आणि अनेक दस्तऐवज धूळ व जुन्या कापडात गुरफटून पडले. एका प्रमाणपत्रासाठी नागरिकांना आठवडे, तर कधी महिने प्रतीक्षा करावी लागत होती. ई वार्डचा हा ऐतिहासिक ठेवा जतन करण्याचे आव्हान प्रशासनासमोर होते, असे त्या म्हणाल्या. डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांनी पुढे नमूद केले की, जुन्या अभिलेखांच्या सुरक्षित संवर्धनासाठी महानगरपालिकेने 'व्हिजन एआय प्रोजेक्ट' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हा उपक्रम म्हणजे भविष्याच्या दिशेने टाकलेले महत्तवपूर्ण पाऊल आहे. या प्रकल्प अंतर्गत अनेक वर्षांपासूनच्या लाखांहून अधिक हस्तलिखित नागरी नोंदींचे जतन करण्यासाठी अत्याधुनिक एआय-आधारित डिजिटल तिजोरी (व्हिजन एआय वॉल्ट) उभारण्यात येणार आहे. हे साधे स्कॅनिंग किंवा पारंपरिक, कालबाह्य ऑप्टीकल कॅरेक्टर रिकग्निशन (OCR)' तंत्रज्ञान पुरते मर्यादित नसून, दस्तऐवजांना नवसंजीवनी दिली जाणार आहे. ही प्रणाली वळणदार इंग्रजी, मराठी आणि हिंदी हस्तलिखित लिपी अचूकपणे वाचू शकते; काळाच्या ओघात पुसट झालेल्या अक्षरांना पुन्हा स्पष्ट करू शकते; शाईच्या उमटलेल्या डागांमुळे निर्माण झालेला गोंधळ दूर करू शकते; तसेच स्वातंत्र्यपूर्व काळातील नाजूक आणि जीर्ण पानांनाही नव्याने स्पष्टता व ओळख प्राप्त करून देऊ शकते. ज्या प्रक्रियेसाठी पूर्वी किमान ३० दिवस, तर काही प्रकरणांमध्ये तब्बल एक ते दीड वर्ष प्रतीक्षा करावी लागत होती, ती सेवा आता अवघ्या काही सेकंदात उपलब्ध होणार आहे. नाजूक आणि जीर्ण नोंदवह्यांमधील किचकट हाताने शोध, नागरिकांच्या लांबच लांब रांगा आणि अनिश्चिततेने भरलेली प्रतीक्षा याला आता पूर्णविराम मिळणार असून, नागरिकांना अधिक जलद, अचूक आणि सुलभ सेवा अनुभवता येणार आहे.

# पॉलिटेक्निकच्या शिक्षकांना मिळणार विशेष प्रशिक्षण



**मुंबई (नितीन देवळेकर) :** राज्यातील पॉलिटेक्निक महाविद्यालयांमधील शिक्षकांचे तांत्रिक कौशल्य आणि अध्यापन क्षमता अधिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने यंदा 'फॅकल्टी डेव्हलपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम' (एफडीटीपी) राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यास इच्छुक असलेल्या तंत्रनिकेतन संस्थांकडून मंडळाने प्रस्ताव मागविले असून, पात्र संस्थांनी २३ मेपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत दरवर्षी शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी एक आठवड्याचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला जातो. बदलत्या तांत्रिक युगात शिक्षकांचे ज्ञान अद्ययावत राहावे, उद्योग क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी आणि विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण शिक्षण देता यावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविला जातो. यंदाही राज्यातील विविध तंत्रनिकेतन संस्थांमध्ये हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. 'फॅकल्टी डेव्हलपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम' हा पॉलिटेक्निकमधील शिक्षकांचे तांत्रिक ज्ञान, अध्यापन कौशल्य व उद्योगाभिमुख दृष्टी सक्षम करण्यासाठी आयोजित केला जाणारा प्रशिक्षण कार्यक्रम आहे. यामध्ये नवीन तंत्रज्ञान, आधुनिक अध्यापन पद्धती, उद्योग क्षेत्रात वापरले जाणारे सॉफ्टवेअर, हरित ऊर्जा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ऑटोमेशन, तसेच प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव यांसारख्या विषयांचा समावेश असतो. शिक्षकांना बदलत्या तांत्रिक गरजांनुसार अद्ययावत ठेवून विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण आणि उद्योगाभिमुख शिक्षण देता यावे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये औद्योगिक भेटींचाही समावेश असणार आहे. त्यामुळे शिक्षकांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाज, तांत्रिक बदल आणि आधुनिक यंत्रणांची माहिती प्रत्यक्ष पाहता येणार आहे. हरित ऊर्जा, नवीन तंत्रज्ञान आणि प्रत्यक्ष वापरातील आधुनिक सॉफ्टवेअर प्रणालींशी संबंधित विषयांना यंदा विशेष प्राधान्य दिले जाणार असल्याचे मंडळाने स्पष्ट केले आहे.

# सर्वसामान्यांच्या 'म्हाडा' स्वप्नांना 'खोडा'

## किंमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर




**मुंबई (सम्यक कासारे) :** म्हाडाच्या मुंबई मंडळ सोडतीसाठी अर्ज करण्यासाठी आता केवळ शेवटचे १० दिवस शिल्लक राहिले आहेत; मात्र अद्याप जेमतेम ६० हजार अर्ज अनामत रकमेसह दाखल झाले आहेत. म्हाडाचा बदललेला दृष्टिकोन, सोडतीत श्रीमंतांच्या घरांना मिळणारे महत्त्व आणि म्हणून घरांच्या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाणे या परिस्थितीचा परिणाम म्हणून आता म्हाडा सोडतीला अर्जदारांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात घटत चालला आहे. यापूर्वी २०२३ मध्ये म्हाडाने ४ हजार घरांची सोडत काढली होती. त्यापैकी निम्मी घरे पीएमएवाय योजनेंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटाला उपलब्ध झाली. या घरांची किमान किंमत ३० लाख होती; मात्र हा अत्यल्प उत्पन्न गटासाठी म्हाडाने बांधलेला शेवटचा गृहनिर्माण प्रकल्प ठरला. २०२४ मध्ये आलेल्या सोडतीतही अत्यल्प आणि अल्प गटाला फारसा वाव नव्हता. पुढील सोडतीकडे डोळे लावून बसलेल्या अर्जदारांची निराशा झाली. २०२५ मध्ये सोडत निघालीच नाही. यावर्षी एप्रिलपासून सोडतीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली; मात्र जाहिरात पाहताच अत्यल्प उत्पन्न गटाची आशाच संपुष्टात आली. यंदाच्या सोडतीत अत्यल्प उत्पन्न गटासाठी केवळ १४५ सदनिका आहेत. अल्प गटासाठी ८५८ सदनिका आहेत. मध्यम गटासाठी १४०८ तर उच्च गटासाठी २२९ सदनिका होत्या. विक्रोळी येथील मध्यम गटाच्या १२२१ घरांच्या किमती प्रचंड असल्याने त्यासाठी अर्जदारांचा प्रतिसादच मिळेना.

> म्हाडाची स्थापनाच मुळात गिरणी कामगार, कष्टकरी आणि मध्यमवर्गीय नागरिकांना परवडणारी घरे मिळवून देण्यासाठी झाली असताना सध्याची सोडत मात्र सर्वसामान्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. या सोडतीत अत्यल्प आणि अल्प उत्पन्न गटासाठी अत्यंत कमी घरे ठेवून, श्रीमंतांच्या उच्च आणि मध्यम गटाला झुकते माप देण्यात आले आहे. त्यातही म्हाडाच्या घरांच्या किमती आता थेट खासगी बिल्डरांच्या तोडीस तोड झाल्यामुळे ती सामान्यांच्या बजेटबाहेर गेली आहेत. बँकांकडून कर्ज मिळणे कठीण झाले आहे आणि मिळाले तरी त्याचा अवाढव्य मासिक हप्ता भरणे मध्यमवर्गीयांच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने नफेखोरी थांबवून उच्च गटासाठी घरे बांधणे पूर्णपणे बंद करावे.
>
> **- विवेक साटम, इच्छुक अर्जदार**

या घरांच्या किमतींमध्ये ७.५ टक्क्यांची घटही करण्यात आली. त्यानंतरही घरे विकली जात नसल्याने त्यापैकी ६१० घरे उच्च गटात वर्ग करण्याची नामुष्की म्हाडावर ओढवली. सध्या परिस्थिती अशी आहे की, उच्च उत्पन्न गटापेक्षा अल्प उत्पन्न गटातील घरे महाग आहेत. विक्रोळी प्रकल्पातील मध्यम व उच्च उत्पन्न गटातील १२२१ घरांच्या किमती दीड कोटींहून कमी आहेत. अल्प उत्पन्न गटासाठीच्या वरळी येथील घरांच्या किमती मात्र २ कोटींच्या घरात आहेत. अत्यल्प उत्पन्न गटासाठी केवळ विक्रोळी येथे ८६ सदनिका नव्याने बांधल्या जात आहेत. त्यांची किंमत ५० लाख आहे. अत्यल्प उत्पन्न गटाची इतर घरे पूर्वीच्या सोडतींतील शिल्लक घरे आहेत. त्यामुळे म्हाडा अत्यल्प उत्पन्न गटासाठी नव्याने घरेच बांधत नसल्याचे दिसत आहे. पूर्वी ३-४ लाखांवर येणारे अर्ज आता १ लाखांचा टप्पाही पार करताना दिसत नाहीत. परिणामी, सामान्यांसाठी घरे बांधण्याच्या मूळ हेतूचाच म्हाडाला विसर पडल्याचे दिसत आहे.

# बुलेट ट्रेनसाठी ३५०टन वजनाचा कटरहेड जमिनीखाली; प्रकल्पाचा महत्त्वाचा टप्पा पार



**मुंबई (गणेश बागडे) :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी एक महत्त्वाचा टप्पा पार पडला असून मुंबईतील विक्रोळी येथे टनेल बोरिंग मशीनचा पहिला कटरहेड यशस्वीरित्या खाली उतरवण्यात आला. १३.६मीटर व्यास आणि तब्बल ३५०टन वजन असलेला हा भाग टीबीएमच्या मुख्य शिल्डच्या प्राथमिक जुळणीमधील अंतिम टप्पा मानला जातो. सध्या ३ हजार टनांहून अधिक वजनाच्या दोन टीबीएम मशीनची जोडणी सुरू असून त्या मुंबईतील २१ किमी लांबीच्या बोगद्यांपैकी १६ किमी भागाचे काम करणार आहेत. यामध्ये ठाणे खाडीखालून जाणारा ७ किमी लांबीचा भारतातील पहिला समुद्राखालील रेल्वे बोगदाही समाविष्ट आहे. रेल्वे बोगदा बांधकामासाठी देशात प्रथमच एवढ्या मोठ्या टीबीएम मशीनचा वापर केला जात आहे. १३.६मीटर व्यासाचा हा कटरहेड हाय-स्पीड रेल्वेच्या अप आणि डाउन दोन्ही लाईन्ससाठी एकाच मोठ्या बोगद्याचे खोदकाम करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. ३५०टन वजन म्हणजे साधारणपणे २५० मध्यम आकाराच्या एसयूव्ही गाड्यांच्या वजनाइतके पाच वेगवेगळ्या भागांमध्ये आणलेल्या या युनिटला साइटवर १ हजार ६०० किलो उच्च-प्रिसिजन वेल्डिंगच्या मदतीने जोडण्यात आले. या युनिटमध्ये ८४ कटिंग डिस्क, १२४ स्क्रेपर्स आणि १६ बकेट लिप्स बसवण्यात आले आहेत, जे खोदकामादरम्यान माती आणि दगड प्रभावीपणे कापून बाहेर काढण्याचे काम करतात.स्पोर्ट्स न्यूज कटिंग डिस्क हे मुख्य साधन असून ते खडक कापण्याचे काम करतात. त्यानंतर कटरहेडवर बसवलेले स्क्रेपर्स माती आणि दगड साफ करण्याचे काम करतात. बकेट लिप म्हणजे कटरहेडमधील ते उघडे भाग ज्यातून माती आणि दगड मशीनच्या मक्क चेंबरमध्ये प्रवेश करतात. यामुळे मलबा गोळा करून तो पाइपलाइन प्रणालीद्वारे बोगद्याबाहेर काढला जातो. ही टीबीएम विक्रोळीहून सुमारे ६ किमीचा प्रवास सुरू करून दाट शहरी भाग आणि मिठी नदीखालून जात वांद्रे-कुर्ला संकुल येथील बांधकामाधीन मुंबई बुलेट ट्रेन स्थानकापर्यंत पोहोचेल.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ,**
**दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

**ई -निविदा सुचना क्र. १३ सन २०२६-२०२७**

**(फक्त मुंबई उपनगर जिल्हा – पुर्व उपनगरे मजुर सहकारी संस्था यांचे साठी )**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक-२६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मुंबई उपनगर जिल्हा (पुर्व उपनगरे) मजूर सहकारी संस्था मार्यादित, मुंबई, कडून खालील कामाकरोता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारो अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनो राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. नमुद केल्याप्रमाणे अर्जदार मजूर संस्था ज्या उपनगरातील संबंधीत असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करु शकतात.

| अ.क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळर्गाण कामांतर्गत घाटकोपर (पश्चिम), मुंबई येथील सी.आय.डी. युनिट क्र. 7 चे कार्यालय व लॉकअप युनिट. चे काम करणे. | रु.४२३७७०६/- |
| २ | मुळर्गाण कामांतर्गत मुलुंड पोलीस ठाण्याच्या इमारतीस बाह्य प्लास्टर दुरुस्ती, रंगकाम व संबंधित अनुषंगिक कामे करणे. | रु.४९९९९९९/- |
| ३ | मुळर्गाण कामांतर्गत नेहरू नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई येथील इमारत क्र. 108 मध्ये अंतर्गत प्लास्टर दुरुस्ती, रंगकाम, जिन्याचे फ्लोअरिंग, शौचालय व स्नानगृह, स्वयंपाकघरातील प्लॅटफॉर्म तसेच इतर विविध अनुषंगिक कामे करणे. | रु.३९९२१९०/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**ई-निविदाउपलब्धकालावधी- दि. १९/०५/२०२६ ते दि. २६/०५/२०२६ पर्यंत**
**ई-निविदा उघडणे- दि. २७/०५/२०२६**

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/२९०८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :-१२/०५/२०२६

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

आरओसी - 2026-27/क्र- 5/C८५४

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक १९.५.२०२६ ते २६.५.२०२६ पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक २८.५.२०२६ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सी. पी ऑफ़ीस, मुंबई आवारातील बी ब्लॉक पोलीस वसाहतमधील रूम नं २,२४,१० तळमजला येथील नुतनीकरण करणे. | ८,४२,८९५/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | सी. पी ऑफ़ीस, मुंबई आवारातील बी ब्लॉक पोलीस वसाहतमधील रूम नं १,१२,१९ तळमजला येथील नुतनीकरण करणे. | ८,४१,७०६/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | महापालिका मार्ग मुंबई आवारातील ई.ओ.डब्लू ऑफ़ीसचे अंतर्गत व बाह्य गिलावा व रंगकाम करणे. | ८,४२,५३०/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | आझाद मैदान पोलीस ठाणे मुंबई येथील पी.आय. केबीन, डीक्टेशन केबीन व मेझनाईन फ़्लोअर चे दुरुस्तीचे काम करणे. | ८,४१,८०६/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | कुलाबा पोलीस लाईन मुंबई येथील पंप हाऊस व कंपाऊंड वॉल दुरूस्ती करणे. | ८,०७,९५८/- | ८,१००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | सी. पी ऑफ़ीस, मुंबई आवारातील ए ब्लॉक पोलीस वसाहतमधील रूम नं १०७,१०४,१०५ येथील नुतनीकरण करणे. | ८,३७,२४४/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | डी. बी. मार्ग पोलीस ऑफिसर व सर्वंट क्वार्टर्स मुंबई येथील फ्लॅट नं. २ येथे दरवाजा, खिडक्या, डॅडो चे नुतनीकरण व दुरूस्ती करणे. | ८,२६,६५६/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | सी. पी ऑफ़ीस, मुंबई आवारातील ए ब्लॉक पोलीस वसाहतमधील रूम नं ६५,७६,७७ येथील नुतनीकरण करणे. | ८,४२,०७०/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | सी. पी ऑफ़ीस, मुंबई आवारातील ए ब्लॉक पोलीस वसाहतमधील रूम नं ८,२८,६८ येथील नुतनीकरण करणे. | ८,४३,६७४/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | कुलाबा पोलीस लाईन मुंबई येथील पंप रूम व कंपाऊंड वॉल दुरुस्ती करणे. | ८,०७,९५८/- | ८,१००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ११ | सीटी सिव्हील कोर्ट मुंबई येथील गेट नं.५ मधील लिफ्ट ६ व ७ येथे लिफ्ट डक्ट चे नुतनीकरण करणे. | ८,३४,६७१/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १२ | नविन विधानभवन मुंबई येथील टॉवर इमारत ३ ते २० मजल्यावरील फ्लोरींग, पार्टीशन, फॉल्स सिलिंग, दरवाजा, खिडक्या येथे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ७,१२,२७६/- | ७,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १३ | नविन विधानभवन मुंबई येथील डोम इमारत ७ मजल्यावरील रूम नं. ७११ येथे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ६,१३,४९२/- | ६,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १४ | नविन विधानभवन मुंबई येथील एसीपी पॅनलिंग, एसी कँटीन, पॉंड पार्टीशन येथे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ६,१९,०३३/- | ६,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १५ | नविन विधानभवन मुंबई येथील डोम इमारत ७ मजल्यावरील रूम नं. ७१२ येथे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ६,०६,९५७/- | ६,१००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १६ | नविन विधानभवन मुंबई येथील डोम इमारत तळमजला ते ५ मजल्यावरील फ्लोरींग, पार्टीशन, फॉल्स सिलिंग, दरवाजा, खिडक्या येथे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ७,१७,७९७/- | ७,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १७ | सीटी सिव्हील कोर्ट मुंबई येथील गेट नं.६ मधील लिफ्ट ४ व ५ येथे लिफ्ट डक्ट चे नुतनीकरण करणे. | ८,२३,३०९/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/ ४७८६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- १४/५/२०२६

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र- 5/C८५५

# जनगणनेचे काम नाकारणाऱ्या शिक्षकांसह पाणीपुरवठा विभागाच्या ५ जणांवर बदलापुरात गुन्हा दाखल

**ठाणे (तृप्ती गोरे) :** जनगणनेच्या राष्ट्रीय कामात कमालीची हलगर्जी दाखवणे आणि प्रशासनाचे लेखी आदेश देऊनही कर्तव्यावर हजर न राहणे बदलापुरातील पाच जणांना चांगलेच महागात पडले आहे. वारंवार संपर्क साधून आणि रीतसर नोटीस बजावूनही जनगणनेचे काम नाकारल्यामुळे कुळगाव-बदलापूर नगर परिषदेच्या जनगणना विभागाचे मुख्य पर्यवेक्षक तथा मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्या आदेशानुसार या पाचही कर्मचाऱ्यांवर बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रीय कर्तव्याला केराची टोपली दाखवणाऱ्या या कर्मचाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल झाल्यामुळे बदलापूर परिसरात आणि सरकारी वर्तुळात एकच खळबळ उडाली असून कामचुकार अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. भारताची सन २०२७ ची अधिकृत जनगणना प्रक्रिया आता सुरू झाली आहे. त्या संदर्भातील पूर्वतयारी म्हणून कुळगाव-बदलापूर नगरपालिका हद्दीतील विविध शाळा, शासकीय कार्यालये आणि निमशासकीय आस्थापनांमधील कर्मचारी व अधिकाऱ्यांची जनगणनेच्या कामासाठी



विशेष नेमणूक करण्यात आली आहे. गेल्या महिन्याभरापासून या सर्व नियुक्त कर्मचाऱ्यांना नगरपालिकेकडून आवश्यक ते प्रशिक्षण देखील देण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचा टप्पा पूर्ण झाल्यानंतर आता प्रत्यक्ष घरोघरी जाऊन 'घर गणती' करण्याच्या महत्त्वाच्या कामाला सुरुवात झाली आहे. मात्र, नगर परिषदेने आदेश देऊनही काही कर्मचारी आणि शिक्षक अद्यापपर्यंत आपल्या नियुक्त कर्तव्यावर हजर झाले नसल्याचे समोर आले. या राष्ट्रीय मोहिमेत कुळगाव-बदलापूर नगर परिषदेने घरगणतीसाठी नेमलेल्या तीन वेगवेगळ्या भागांतील पर्यवेक्षकांच्या अधिकृत फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (एम.जी.पी. ऑफिस, बदलापूर) व्ही. एस. सांबळे आणि बी. जी. जाधव या दोन पाणीपुरवठा अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तर उर्वरित तीन आरोपींमध्ये बदलापुरातील नामांकित खासगी शाळांमधील शिक्षिका असून, त्यात हेवन बेल कॉन्व्हेंट स्कूलच्या दिपावली सविओ दामोदरे, गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलच्या अर्चना दिनेश मराडे आणि शिरगाव येथील एस.डी.एम. हायस्कूलच्या पूजा चेतन चव्हाण यांचा समावेश आहे. या सर्व जणांवर शासकीय आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस लवकरच त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणार आहेत. जनगणना हे सर्वोच्च राष्ट्रीय कर्तव्य असूनही या कर्मचाऱ्यांनी नगर परिषदेच्या जनगणना विभागाचे मुख्य पर्यवेक्षक मारुती गायकवाड यांचे आदेश थेट धुडकावून लावले होते. या कर्मचाऱ्यांना हजर होण्यासाठी प्रशासनाकडून वारंवार दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्यात आला होता, तसेच लेखी आदेशही बजावण्यात आले होते. मात्र, त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून कामावर न येण्याचा हेकेखोरपणा या कर्मचाऱ्यांनी दाखवला. या कारवाईनंतर जनगणनेच्या कामात हयगय करणाऱ्या आणि आपली ड्युटी रद्द करून घेण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यालयात वेगवेगळ्या सबबी सांगत चकरा मारणाऱ्या इतर शासकीय व खासगी कर्मचाऱ्यांमध्ये मोठी भीती पसरली आहे. या संपूर्ण प्रकरणावर कुळगाव-बदलापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी अत्यंत कडक भूमिका घेतली आहे. जनगणना हे देशाचे अत्यंत महत्त्वाचे कायदेशीर आणि राष्ट्रीय कर्तव्य असून यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा किंवा टाळाटाळ खपवून घेतली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# चिखले ग्रामस्थांचा आक्रमक पवित्रा

## जलजीवन योजनेच्या प्रश्नावर सरपंचांचे आमरण उपोषण, लेखी आश्वासनानंतर स्थगित

**ठाणे (विशाल कारंडे) :** मुरबाड तालुक्यातील चिखले (वढू) ग्रामपंचायत हद्दीत गेल्या काही दिवसांपासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेली पाणीपुरवठा योजना निकृष्ट व अर्धवट असल्याचा आरोप करत ग्रामपंचायत चिखलेच्या सरपंच सौ. मालती दिपक हरड यांनी ग्रामस्थांसह पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. गावातील पाणीपुरवठा योजना पूर्णपणे निकामी झाल्याचा आरोप करत संबंधित ठेकेदार व पाणीपुरवठा अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करावी, तसेच विहिरीत पाणीउद्भव नसल्याने नव्याने विहीर खोदून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी ग्रामस्थांची प्रमुख मागणी होती. दरम्यान, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग मुरबाडचे उपअभियंता जगदीश बनकरी यांनी अस्तित्वातील उद्भव विहिरीचे खोलीकरण येत्या दोन दिवसांत करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर हे उपोषण तूर्तास स्थगित करण्यात आले. जल जीवन मिशन अंतर्गत सन २०२३ मध्ये गावात नदीपात्रात विहीर बांधण्यात आली होती. मात्र विहिरीतील पाणीपातळी मोठ्या प्रमाणात घटल्याने गावात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न



निर्माण झाला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार विहिरीतील पाणी विद्युत पंपापेक्षा १ ते २ मीटर खाली गेल्याने जलपुरवठा विस्कळीत झाला आहे. या संदर्भात ग्रामपंचायतीकडून पाणीपुरवठा विभाग, पंचायत समिती तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार लेखी व तोंडी पाठपुरावा करण्यात आला होता. कोकण आयुक्त कार्यालयाकडेही फोटोसह माहिती सादर करण्यात आल्याचे सरपंचांनी सांगितले. मात्र ठोस कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. याच पार्श्वभूमीवर सरपंच मालती हरड यांनी ग्रामस्थांसह आमरण उपोषणाचा निर्णय घेत "गावाला न्याय मिळेपर्यंत उपोषण सुरू राहील," असा इशारा प्रशासनाला दिला होता. लेखी आश्वासनानंतर ग्रामस्थांनी उपोषण तात्पुरते स्थगित केले असून, दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी लवकरात लवकर व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# खर्डी स्थानकावर तिकीट खिडकी बंद; प्रवाशांचा संताप

**ठाणे (राकेश गायकवाड) :** मध्य रेल्वेच्या आसनगाव – कसारा दरम्यान सुरू असलेल्या तिसऱ्या मार्गाच्या कामा दरम्यान लोकल विलंबाने सुरु असल्याने प्रवासी आधीच त्रस्त असताना रविवारी दुपारी खर्डी रेल्वे स्थानकावर तिकीट खिडकीवरील कर्मचारी अनुपस्थित असल्याचा प्रकार समोर आला. यामुळे तिकीटासाठी रांगेत उभ्या असलेल्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली असून काहींना विनातिकीट प्रवास करण्याची वेळ आल्याने प्रवाशांत संताप व्यक्त केला. मध्य रेल्वेच्या उपनगरी मार्गावरील प्रवाशांना गेल्या काही महिन्यांपासून वारंवार होणारे ब्लॉक, सिग्नल यंत्रणेमधील बिघाड, ओव्हरहेड वायर तुटणे तसेच लोकल गाड्यांना थांबवून एक्सप्रेस गाड्यांना प्राधान्य दिले जाणे अशा विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. याबाबत प्रवाशांकडून सातत्याने तक्रारी होत असतानाही प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याचा आरोप केला जात आहे. दरम्यान, आसनगाव – कसारा दरम्यान तिसऱ्या मार्गाचे काम सुरू असल्याने रविवारीही ब्लॉक घेण्यात आला होता. अशा परिस्थितीत दुपारी २.५९ वाजता सीएसएमटी लोकलसाठी तिकीट काढण्यास आलेल्या प्रवाशांना तिकीट खिडकी बंद असल्याचे आढळून आले. त्यावेळी सुमारे १५ ते १६ प्रवासी रांगेत उभे होते. ड्युटीवरील कर्मचारी आपली वेळ संपल्याने कसारा लोकलने निघून गेल्याचे प्रवाशांना सांगण्यात आले. विशेष म्हणजे दुसऱ्या सत्रातील कर्मचारीही त्याच गाडीने येणार असल्याने काही काळ स्थानकावरील तिकीट सेवा पूर्णपणे ठप्प झाली होती. परिणामी अनेक प्रवाशांना ऑनलाइन तिकीट काढून प्रवास करावा लागला, तर काहींना विनातिकीट प्रवास करण्याची वेळ आली. सर्व प्रवाशांना मोबाईल ॲप किंवा ऑनलाइन सेवा वापरणे शक्य नसल्याने नागरिकांनी रेल्वे प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली. ब्लॉकच्या काळात प्रवाशांची गर्दी वाढलेली असताना तिकीट वितरणासाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने "तिकीटच मिळाले नाही तर तपासणीदरम्यान दंड भरायचा कोणी?" असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित करण्यात आला.

# अर्नाळा येथील कारवाईबाबत पालघर जिल्हा प्रशासनाचे स्पष्टीकरण; पारंपरिक मच्छीमारांच्या संरक्षणाचा पुनरुच्चार

**पालघर (सचिन कदम) :** अर्नाळा येथे नुकत्याच करण्यात आलेल्या अतिक्रमण निष्कासन कारवाईबाबत काही सोशल मीडिया पेजेस व माध्यम संस्थांकडून प्रसारित करण्यात येणारी दिशाभूल करणारी व चुकीची माहिती लक्षात घेऊन पालघर जिल्हा प्रशासनाकडून हे स्पष्टीकरण देण्यात येत आहे. प्रशासनाने पुनरुच्चार केला आहे की, सर्व कारवाई पूर्णपणे कायदेशीर चौकटीत राहून करण्यात आली असून पारंपरिक मच्छीमार समाजाच्या हक्कांचे संरक्षण करणे हेच प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. अधिकृत अभिलेखांनुसार, सर्वे क्रमांक ४४ आणि ४५ ही जमीन 'शासकीय गुरचरण' म्हणून वर्गीकृत आहे. या जमिनीच्या ७/१२



उताऱ्यावरील इतर हक्कांमध्ये ही जमीन पारंपरिक मच्छीमार समाजासाठी मासळी सुकविणे, बोटींची दुरुस्ती आणि बोट बांधणी यांसारख्या कामांसाठी आरक्षित असल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. अतिक्रमणांबाबतच्या असंख्य तक्रारींनंतर मत्स्य विभाग, महसूल विभाग आणि भूमी अभिलेख विभाग यांच्या वतीने संयुक्त पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान असे दिसून आले की, काही मच्छीमारांनी मासळी सुकवण्यासाठी ओटे, शेड्स आणि तात्पुरती बांधकामे उभारली होती. मात्र, काही विशिष्ट क्षेत्रांमध्ये काही व्यक्ती आणि गटांकडून निवासी बांधकामे आणि अनधिकृतरीत्या भाजीपाला लागवड केली जात होती. ही संयुक्त निष्कासन मोहीम १३ मे, २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता मत्स्य विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत सुरू झाली. या कारवाईदरम्यान, सर्वे क्रमांक ४५ मधील ३२ अनधिकृत बांधकामे हटवण्यात आली आणि सर्वे क्रमांक ४४ मधील १२ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. याशिवाय, १८ अतिक्रमणधारकांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून टाकली. पालघर जिल्हा प्रशासन पारंपरिक मच्छीमार आणि पात्र रहिवाशांच्या उपजीविकेचे आणि हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. बेकायदेशीर व्यावसायिक अतिक्रमणे आणि जमीन बळकावणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध कारवाई करण्याच्या निर्णयावर प्रशासन ठाम असले तरी, कोणत्याही पात्र रहिवाशाला किंवा पारंपरिक मच्छीमाराला अन्यायकारकपणे हटवले जाणार नाही. सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या व्हिडिओंबाबत जिल्हा प्रशासनाचे असे म्हणणे आहे की, हे व्हिडिओ केवळ दिशाभूल करणारे तुकडे आहेत आणि ते मच्छीमार समाजाच्या उपजीविकेसाठी आरक्षित असलेल्या जमिनीवरील बेकायदेशीर अतिक्रमणांचे संपूर्ण वास्तव दर्शवत नाहीत. प्रत्येक बांधकामाची पारदर्शकता, संवेदनशीलता आणि महाराष्ट्र शासनाच्या नियमितीकरण धोरणानुसार सखोल पडताळणी केली जात आहे.

# भिवंडी पालिका प्रशासन बकरीईदसाठी पूर्ण व्यवस्थेसह सज्ज


**भिवंडी (आकाश कांबळे) :** भिवंडी महानगरपालिका प्रशासनाने बकरीद सणासाठी सर्व आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. २७ मे पासून सुरू होणाऱ्या या सणासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्णपणे सतर्क आणि सज्ज आहे. हा सण शहरात तीन दिवस साजरा केला जाईल. महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर यांनी आतापर्यंत कुर्बानी केंद्रे, स्वच्छता, पाण्याची उपलब्धता, कचरा विल्हेवाट, पशुवैद्यकीय तपासणी आणि कायदा व सुव्यवस्था यांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी तीन बैठका घेतल्या आहेत. प्रशासनाने शहरात अधिकृत कुर्बानी केंद्रे निश्चित केली असून, नागरिकांना केवळ त्याच केंद्रांवर जनावरांची कुर्बानी देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महापालिका आयुक्तांनी घेतलेल्या आढावा बैठकांमध्ये, कुर्बानी केंद्रे, तेथे पुरविल्या जाणाऱ्या मूलभूत सुविधा, कचरा उचलण्यासाठी कर्मचारी व गाड्यांची नियुक्ती, स्वच्छतेसाठी पाण्याच्या टँकरची तरतूद, कुर्बानी केंद्रांच्या परवानगीसाठी स्वतंत्र कक्ष सुरू करणे, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागाशी समन्वय, म्हाडा कॉलनीत शेळी बाजार उभारण्याची व्यवस्था, कुर्बानीच्या दिवशी जनावरांची तपासणी करण्यासाठी पशुवैद्यकीय डॉक्टरांची नियुक्ती आणि कुर्बानीसाठीच्या जनावरांचे शुल्क इत्यादी महत्त्वाच्या विषयांचा आयुक्तांकडून आढावा घेण्यात आला. जवळच्या रहिवाशांना होणारा त्रास टाळण्यासाठी, जनावरांचा कचरा गोळा करणाऱ्या




वाहनांवर कर्मचारी तैनात करण्याचे आणि प्रत्येक फेरीनंतर कचरा पुरण्याच्या ठिकाणी जंतुनाशक फवारणी करण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले आहेत. बकरीदसाठी निश्चित केलेल्या बळी केंद्रांची यादी लवकरच प्रसिद्ध केली जाईल. या केंद्रांवर नियुक्त केलेल्या पशुवैद्यकांकडून जनावरांची तपासणी करून घेतल्यानंतरच बळी द्यावा, असे आवाहन प्रशासनाने सर्वांना केले आहे. आवश्यक तपासणी शुल्क भरून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. स्वच्छता आणि आरोग्य लक्षात घेऊन, सरकारने बळी देणाऱ्या केंद्रांच्या सर्वसमावेशक यादीसाठी विनंतीही केली आहे. कुर्बानी सेंटरवर दुर्गंधी व अस्वच्छता होऊ नये याकरिता, महानगरपालिका प्रशासनाने विशेष व्यवस्था केली आहे. बळी दिल्यानंतर तात्काळ स्वच्छतेसाठी ३५ पाण्याचे टँकर तैनात करण्यात आले आहेत. कचरा उचलण्यासाठी आणि त्याची विल्हेवाट लावण्यासाठी २०० टेम्पो आणि डम्पर, १७ जेसीबी, ३ क्रेन आणि पशुवैद्यकीय डॉक्टरांसाठी १३ वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. कचरा विल्हेवाटीच्या ठिकाणी नियमितपणे औषध फवारणी करण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले आहेत, जेणेकरून जवळपास राहणाऱ्या लोकांना कोणत्याही प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागणार नाही. याशिवाय, बळी देण्यापूर्वी पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून जनावरांची तपासणी केली जाईल. प्रशासनाने सर्व नागरिकांना आवाहन केले आहे.

# नरभक्षक बिबट्याला पकडण्यात वनविभागाला यश

**ठाणे (सम्यक कासारे) :** तालुक्यातील डोळखांब वनपरीक्षेत्रातील कळभोंडे परिसरात आठ वर्षीय मुलाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर वनविभागाने राबविलेल्या विशेष मोहिमेला अखेर यश आले. बिबट्याला रविवारी सकाळी पकडण्यात यश आल्याने ग्रामस्थांमध्ये काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. डोळखांब वनपरिमंडळातील कळभोंडे (लादेवाडी) येथे २१ एप्रिलला कृष्णा भागा अगीवले (८) या मुलावर बिबट्याने हल्ला केला होता. यात कृष्णा याचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. बिबट्याला पकडण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थ करत होते. वनविभागाने बिबट्याचा शोध घेण्यासाठी पिंजरे, ट्रॅप कॅमेरे आणि लाईव्ह सीसीटीव्ही कॅमेरे बसविले होते. तसेच गस्ती पथक आणि जलद प्रतिसाद पथकाकडून सातत्याने परिसरात गस्त घालण्यात येत होती. या मोहिमेदरम्यान रविवारी सकाळी साडेसातच्या सुमारास संबंधित बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याचे वनविभागाच्या निदर्शनास आले. ज्या ठिकाणी बिबट्या जेरबंद झाला ते ठिकाण आणि मुलावर हल्ला झाल्याचे ठिकाण हे सुमारे एक किलोमीटरच्या परिसरात असल्याचे वनाधिकाऱ्यांनी सांगितले. सदर बिबट्याला 'फिजिकल कॅप्चर' पद्धतीने सुरक्षितरीत्या जेरबंद करण्यात



आले असून त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नियमानुसार पुढील प्रक्रिया सुरू असल्याची माहिती वनविभागाने दिली.ही कारवाई वनविभाग, पोलीस तसेच ग्रामस्थांच्या सहाकार्याने पार पडली. मानव–वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी पुढेही प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे वनविभागाने स्पष्ट केले आहे.

# गडगपाडा येथील घटनेबाबत पालघर जिल्हा प्रशासनाचे स्पष्टीकरण

## दिशाभूल करणाऱ्या वृत्तांचे खंडन व खनिज अंमलबजावणीबाबत कठोर भूमिकेचा पुनरुच्चार

**पालघर (रघुनाथ कदम) :** शिरगाव येथील गडगपाडा गावात घडलेल्या हिंसक घटनेबाबत काही माध्यम संस्था व सोशल मीडियावर प्रसारित होत असलेल्या चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या वृत्तांच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्हा प्रशासनाकडून हे अधिकृत स्पष्टीकरण जारी करण्यात येत आहे.

**गडगपाडा घटना :** लोकतांत्रिक लोकराज्यम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमितकुमार चौधरी यांनी गडगपाडा येथील सर्वे क्रमांक ३२८/८/अ मधील खाणीसंदर्भात पीजी पोर्टलवर तक्रार दाखल केली होती. त्यानंतर वसई तहसीलदार यांनी विरारचे मंडळ अधिकारी प्रभाकर पाटील यांना प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. दि. १२ मे २०२६ रोजी पाहणीदरम्यान प्रभाकर पाटील यांनी सर्वे क्रमांक ३१३/१४ व ३१३/१६ येथील क्रशर युनिट सीलबंद अवस्थेत आढळून आले. त्यानंतर ते सर्वे क्रमांक ३२८/८/अ येथील महेश पाटील यांच्या खाणीच्या दिशेने जात असताना तीन मोटारसायकलींवर आलेल्या तीन व्यक्तींनी त्यांच्या वाहनाचा पाठलाग केला. प्रभाकर पाटील यांनी तक्रारदारास दूरध्वनीद्वारे खाण बंद असून तेथे कोणतीही पोकलेन मशीन सुरू नसल्याची माहिती दिली. त्यानंतर तक्रारदाराने त्यांना थांबण्याची विनंती करून आपला प्रतिनिधी म्हणून आत्माराम पाटील यांना घटनास्थळी पाठविले. आत्माराम पाटील घटनास्थळी आल्यानंतर ते प्रभाकर पाटील यांच्यासोबत खाणीच्या परिसरात गेले. त्यानंतर ते पुन्हा खाणीच्या दिशेने जात असताना मोटारसायकलवर आलेल्या तिन्ही व्यक्तींनी त्यांच्याकडे येत निकेतन पाटील यांनी आत्माराम पाटील यांच्या मोटारसायकलीची चावी हिसकावून घेतल्याचा आरोप आहे. त्यानंतर खाण मालक महेश पाटील, त्यांच्या कुटुंबीयांसह इतर काही व्यक्तींमध्ये वाद झाला. प्रभाकर पाटील यांनी विरार पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, संबंधितांनी प्रभाकर पाटील व आत्माराम पाटील यांच्यावर काठ्या, दगड व लोखंडी रॉडने हल्ला केला. या घटनेत प्रभाकर पाटील जखमी झाले व घटनास्थळावरून बचाव करण्यात यशस्वी झाले, तर आत्माराम पाटील यांचा गंभीर जखमांमुळे मृत्यू झाला. या प्रकरणी भालचंद्र लक्ष्मण पाटील, महेश भालचंद्र पाटील, प्रताप भालचंद्र पाटील, निकेतन महेश पाटील व अन्य एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस विभागाकडून पुढील तपास सुरू आहे.

**तथ्यात्मक चुकींचे खंडन :** ही घटना "खाण माफिया" कडून करण्यात आलेली सुनियोजित हत्या असल्याचे तसेच शासकीय अधिकाऱ्यांनी खाण मालकांशी संगनमत केल्याचे काही माध्यमांमध्ये प्रसारित करण्यात आले आहे. काही वृत्तांमध्ये आत्माराम पाटील यांची दगडांनी ठेचून हत्या करण्यात आल्याचा तसेच मंडळ अधिकारी प्रभाकर पाटील यांनी खाण मालकांशी संगनमत केल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र पालघर जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, अशा प्रकारच्या बातम्या अपूर्ण व चुकीच्या माहितींवर आधारित असून सध्या उपलब्ध माहितीनुसार त्या दाव्यांना कोणताही तथ्यात्मक आधार नाही. त्यानंतर दि. १३ मे २०२६ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी, नायब तहसीलदार व विरारचे तलाठी यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेसंदर्भातील माहिती संकलित केली.

**पारदर्शक अंमलबजावणीबाबत बांधिलकी :** पालघर जिल्हा प्रशासनाकडून गौण खनिजांवर कठोर देखरेख ठेवण्यात येत असून उत्खनन व वाहतुकीसाठी वैध परवानगी आवश्यक आहे. आजपर्यंत दंडाच्या स्वरूपात ₹४८७१.१३ लाख रक्कम शासन तिजोरीत जमा करण्यात आली आहे, यावरून प्रशासनाचा कोणत्याही नियमभंग करणाऱ्यांशी कोणताही स्वार्थसंबंध नसल्याचे स्पष्ट होते. तसेच जिल्हा व तालुका स्तरावर मोबाईल पथके बेकायदेशीर कारवायांवर सातत्याने लक्ष ठेवून आहेत. मागील पाच वर्षांत पालघर जिल्ह्यात खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. बेकायदेशीर वाहतूक/उत्खनन : ६२५ प्रकरणांमध्ये ₹२९०७.८८ लाख दंड वसूल करण्यात आला. अतिरिक्त उत्खनन : ईटीएस मोजमापाद्वारे ६३ प्रकरणे निष्पन्न होऊन ₹१९६३.२५ लाख रक्कम वसूल करण्यात आली. परवाना अंमलबजावणी : परवाना नसलेल्या ६९ क्रशर प्लांट्स व ३७ आर.एम.सी. प्लांट्स सील करण्यात आले असून २८ एफआयआर दाखल करण्यात आले. दि. १ एप्रिल ते १५ मे २०२६ या कालावधीत वाडा व विक्रमगड तालुक्यातील ७२ खाणींचे ईटीएस तंत्रज्ञानाद्वारे मोजमाप करण्यात आले असून इतर तालुक्यांतील मोजमाप सुरू आहेत. अतिरिक्त उत्खनन आढळल्यास फरकाची रक्कम वसूल करण्यात येणार आहे. वैतरणा, शिरगाव, परगाव, खानिवडे व उंबरपाडा येथील वाळू चोरीच्या ठिकाणी उड्डाण पथकांकडून कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सन २०२४-२५ मध्ये बेकायदेशीर उत्खननाच्या १७ प्रकरणांत ₹६२८.९८ लाख दंड आकारण्यात आला असून सन २०२५-२६ मध्ये १५ प्रकरणांत ₹१३१० लाख दंड आकारण्यात आला आहे. वसुलीची कार्यवाही तहसील व उपविभाग स्तरावर सुरू असून चार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महसूल प्रशासनाकडून वाळू व गौण खनिजांच्या बेकायदेशीर साठवणूक व वाहतुकीविरोधात दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई सातत्याने करण्यात येत आहे. प्रशासनाने खोट्या व दिशाभूल करणाऱ्या माहितीच्या प्रसाराविरोधात इशारा देत सार्वजनिक संसाधनांचे संरक्षण व कायद्याची पारदर्शक अंमलबजावणी करण्याबाबत कटिबद्धता व्यक्त केली आहे.

# आंबेगणी घाट: रस्ता अरुंद, दरी खोल; प्रवाशांच्या डोक्यावर मृत्यूची टांगती तलवार

## घाटातील रस्ता रुंदीकरणासाठी ग्रामस्थांची मा. मंत्री महोदयांकडे धाव!

**रायगड (सचिन कदम) :** रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांतून जाणाऱ्या महाड-मंडणगड तालुक्यातील 'तुडील फाटा ते आदिस्ते फाटा' या आंबेगणी घाटातील प्रवास सध्या प्रवाशांसाठी अत्यंत त्रासदायक व जीवघेणा ठरत आहे. घाटातील कमालीचा अरुंद रस्ता, टप्प्या टप्प्यावरील तीव्र वळणे आणि संरक्षण भिंतच नसल्यामुळे येथे रोजच अपघातांची मालिका सुरू आहे. विशेषतः या धोकादायक वळणांवरून एसटी बस नेताना चालकांची मोठी दम छाक होऊन चालकाला तारेवरची कसरत करावी लागते. प्रवाशांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण आहे. वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने, अखेर कुडूक खुर्द (हनुमानवाडी) येथील ग्रामस्थांनी रोजगार हमी व खारभूमी विकास मंत्री माननीय नामदार भरत शेठ गोगावले यांची भेट घेऊन तातडीने निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे. 'पंतप्रधान मंत्री ग्राम सडक



योजने'च्या धर्तीवर या रस्त्याचे रुंदीकरण करावे आणि मजबूत संरक्षण भिंत उभारावी, असे साकडे ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे मंत्री महोदयांना घातले आहे. त्यांनी दिलेल्या आश्वासनानंतर आता शासन यावर काय पावले उचलते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. अनेक दुर्घटना होऊन देखील या विषयाकडे प्रशासन गांभीर्याने पाहत नाही.

"घाटातील रोजचा प्रवास म्हणजे मृत्यूशी खेळ आहे. प्रशासनाने एखादा मोठा अपघात होण्याची आणि निष्पाप नागरिकांचा बळी जाण्याची वाट न पाहता तातडीने निधी मंजूर करावा. नागरिकांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी आंबेगणी घाटात मजबूत संरक्षण भिंत उभारून आमच्या डोक्यावरची ही रोजची टांगती तलवार कायमची दूर करावी!"

— **संदेश पवार (नियमित प्रवासी, कुडूक ग्रामस्थ )**

"घाटातील वळणावर जेव्हा एसटी बस एकदम दरीच्या टोकावर जाते, तेव्हा आमच्या काळजाचा ठोका चुकतो. पावसाळ्यात धुक्यामुळे काहीच दिसत नाही आणि खोल दरीच्या बाजूने साधी संरक्षण भिंतही नाही. रोज देवाचे नाव घेऊन आम्ही शाळेत जातो. अभ्यासापेक्षा 'आज सुखरूप घरी पोहोचू की नाही' याचीच भीती मनात जास्त असते. सरकारने आमच्या जिवाचे मोल ओळखून रस्ता रुंदीकरण त्वरित करावे."

— **कु.श्रेयस पवार (शाळकरी विद्यार्थी महाड-मंडणगड मार्ग)**

### आंबेगणी घाटातील मुख्य मागण्या

१. तुडील फाटा ते आदिस्ते फाटा मार्गाचे तातडीने रस्त्याचे रुंदीकरण व्हावे.
२. संपूर्ण घाटात मजबूत सिमेंट-काँक्रीटची संरक्षण भिंत उभारण्यात यावी.
३. रात्रीच्या प्रवासासाठी घाटात परावर्तक आणि दिशादर्शक फलक लावावेत.

# वाढत्या तापमानाने मोरांची होरपळ; उष्माघाताचा धोका

**छत्रपती संभाजीनगर (महेश पानसरे) :** वाढत्या तापमानाने मोरांची होरपळ होत आहे. पाणवठेही काही ठराविक अंतरावर असल्याने पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. या भटकंतीतच उष्माघाताचा धोका असून, तापमानाचा प्रजननावरही परिणाम होत असल्याचे वन्यजीव अभ्यासक सांगत आहेत. बीड जिल्ह्यातील नायगाव येथील राष्ट्रीय मयूर अभयारण्यातील मोर पाण्याच्या शोधार्थ नजीकच्या शिवारामध्ये भटकताना दिसत आहेत. पाटोदा तालुक्यातील नायगाव हे देशातील एकमेव मयूर अभयारण्य असून, सुमारे २ हजार २०० हेक्टरपर्यंत विस्तारलेले आहे. या अभयारण्यात वनविभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार ४ हजारांवर मोर आहेत. अभयारण्यात अधिकतर ग्लिरिसिडिया किंवा गिरीपुष्पाची झाडे अधिक असून, उन्हाळ्याच्या सुमारासच या झाडांची पानगळ होते. परिणामी मोरांना पाणवठ्यापर्यंत जाताना सावलीही मिळेनासे चित्र असल्याचे वन्यजीव चळवळीतील कार्यकर्त्यांकडून सांगितले जाते. सध्या मराठवाड्यात ४२ च्या आसपास तापमान असून, १३ मे रोजी बहुतांश भागात ४३ अंशांवर तापमान पोहोचले होते. मोरांना ४० अंशांवरचेही तापमान तापदायक ठरताना दिसत आहे.



मोरांना ४० अंशांवरचेही तापमान सहन होत नाही. बऱ्याचवेळा उष्माघातामुळे बेशुद्ध पडण्याचीही शक्यता असते. सध्या सर्पराज्ञी केंद्रात उष्माघात झालेल्या मोरांची संख्या वाढली आहे. तापमानाचा मोरांच्या प्रजनन क्षमतेवरही परिणाम होतो. – सिद्धार्थ सोनवणे, मानद वन्यजीवरक्षक. नायगाव मयूर अभयारण्यात सहा ते सात हजारांवर मोर आहेत. मोरांना पाणवठे दूर असल्याने भटकंती करावी लागत आहे. उन्हाळ्यात पाणवठ्यातील पाणीही बराचकाळ गरम राहते. उष्माघात झाला तर नजीक उपचाराचे केंद्र नाही. २५ किमी अंतरावरील पाटोदा किंवा बीडला न्यावे लागते. पशुचिकित्सालयाची मागणी तीन वर्षांपासून करतो आहोत. जिल्हाधिकाऱ्यांनाही निवेदन दिले आहे.

# ऑनलाईन औषध विक्री विरोधात २० मे रोजी उरणसह देशभरातील केमिस्टचा 'एक दिवसीय बंद'

**उरण (रघुनाथ कदम) :** केंद्र सरकारच्या ऑनलाईन औषध विक्री धोरणाचा निषेध करण्यासाठी बुधवार, दिनांक २० मे २०२६ रोजी भारत देशातील सर्व केमिस्ट दुकानदारांनी एक दिवसाचा लाक्षणिक बंद पुकारला आहे. ऑनलाईन औषध विक्रीमुळे अंमली पदार्थांसारखी नशा आणणारी व व्यसन जडवणारी औषधे सहज उपलब्ध होण्याची भीती असून, याचा समाजावर अतिशय गंभीर परिणाम होऊ शकतो. या धोक्याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हा देशव्यापी बंद पुकारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, उरण येथील 'हॉटेल आनंदी' येथे 'उरण तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन'ची एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. रायगड जिल्हा केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स



### शासकीय कार्यालयांना दिले निवेदन

असोसिएशनचे अध्यक्ष लीलाधर पाटील आणि जिल्हा सचिव प्रवीण नावंदर यांच्या सूचनेनुसार, बंद दरम्यान नागरिकांचे हाल होऊ नयेत म्हणून केवळ 'इमर्जन्सी पेशंट' (अतितातडीचे रुग्ण) यांच्यासाठी औषध पुरवठा सुरू ठेवण्याची विशेष सूचना करण्यात आली आहे. उरण तालुक्यातील हॉटेल आनंदी येथील बैठकीत उरण तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशनचे तालुकाध्यक्ष उमाकांत पानसरे, तालुका सचिव राजेश्वर पाटील आणि तालुका ओबीसी प्रतिनिधी मनोज ठाकूर यांनी उपस्थित सर्व सभासदांना या आंदोलनाचे गांभीर्य पटवून देत सविस्तर मार्गदर्शन केले. पदाधिकाऱ्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत तालुक्यातील सर्व केमिस्ट सभासदांनी या बंदला जाहीर सहमती दर्शवली. बैठकीच्या शेवटी सर्व औषध विक्रेत्यांनी 'केमिस्ट एकता जिंदाबाद' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. या बंद आंदोलनाची अधिकृत माहिती आणि जिल्हा असोसिएशनचे निवेदन उरण मधील प्रमुख शासकीय कार्यालयाने देण्यात आले. यामध्ये आमदार कार्यालय उरण,तहसीलदार कार्यालय, उरण पोलीस स्टेशन उरण या सर्व कार्यालयामध्ये २० मे रोजीच्या भारत बंद बाबत अधिकृत निवेदन सुपूर्द करण्यात आली आहे. त्याप्रसंगी सर्व शासकीय अधिकाऱ्यांनी केमिस्ट असोसिएशनला प्रशासनाच्या वतीने पूर्ण सहकार्य करण्याचा असा कार्यात्मक आश्वासन दिले नागरिकांनीही राष्ट्रीय जनहितार्थ बंदला सहकार्य करावे असे आवाहन असोसिएशन तर्फे करण्यात आले आहे.

# कोकणवासीयांसाठी पहिला टोल ; सुविधा अपुऱ्या, संताप वाढला

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** मुंबईहून कोकणात जाणाऱ्या लाखो वाहनचालकांना आता खारपाडा येथील पहिल्या टोलनाक्याची पावतीचे शुल्क देऊनच पुढे जावे लागणार आहे. शुक्रवारी सकाळपासून या टोलची सुरूवात केली. टोलवसुली सुरू होणार आहे म्हणून अगोदर सुविधा त्यांना टोल वसुली करा अशी राजकीय पक्षांची मागणी होती. मात्र महामार्गापासून २० किलोमीटर अंतरावरील वाहनमालकांना मासिक सवलतीचा पास देण्यापूर्वीच हा टोलधाड राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सुरू केली. ही टोलवसुली खारपाडा ते कासू या ४२ किलोमीटर अंतरावरील महामार्गाची केली जात आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे काम आणि सुविधा पूर्ण नसतानाच उन्हाळी सुट्यांमध्ये गावी जाणा-यांची संख्या वाढली असतानाच टोलवसुली सुरू झाल्याने कोकणवासीयांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतरही महामार्गावरील कामे संथ गतीने सुरू असून, रूग्णवाहिका, शौचालये, स्थानिक वाहनांना टोलमधून सवलत अशा मूलभूत सुविधा अपुऱ्याच असल्याची तक्रार प्रवाशांकडून केली जात आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने खारपाडा टोलनाक्यावर स्थानिक रहिवासी आणि सर्व एलएमव्ही वाहनांसाठी टोलमाफी लागू करण्याची घोषणा केली. मात्र, या सवलतीचा लाभ घेण्यासाठी काही



अत्यावश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी शिवसेना (ठाकरे गट) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या राजकीय पक्षांसह स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली आहे.त्यामध्ये स्वच्छ व कार्यरत शौचालये, महिलांसाठी व बालकांसाठी स्तनपान कक्ष, आपत्कालीन रुग्णवाहिका व प्रथमोपचार केंद्र, खराब वाहनांसाठी क्रेन सेवा, सुरक्षित व प्रकाशयुक्त दुतर्फा रस्ता तसेच टोल व्यवस्थापनात स्थानिक युवकांना रोजगार देण्याची प्रमुख मागणी आहे. दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते शुक्रवारी (ता. १५) खारपाडा टोलविरोधात आंदोलनासाठी निघाले असता पळस्पे फाटा येथे पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या पोलीस पथकाने त्यांना रोखून कार्यकर्त्यांची त्यांनी समज काढली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेत मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेण्यात आल्याने शुक्रवारी टोलवसुलीचे बुथ आणि मनसेमधील संघर्ष टळल्याची माहिती मनसेचे प्रवक्ते योगेश चिले यांनी दिली. पुढील दहा दिवसांत सर्व अपूर्ण सुविधा कार्यान्वित करून मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसेच्यावतीने देण्यात आला आहे. महामार्गाचे काम पूर्ण होण्यापूर्वीच टोल आकारणी सुरू झाल्याने "सुविधा आधी, टोल नंतर" अशी भूमिका आता अधिक तीव्र होत आहे. परंतू शुक्रवारपासून कोकणवासियांचा पहिला टोल मुंबई गोवा महामार्गावर सुरू झाला.

# नाशिक रिंगरोडसाठी बळजबरीने भूसंपादन, बाधित शेतकरी आत्मक्लेष आंदोलन करणार

**नाशिक (भावना जैन) :** शासनाच्या जमिन संपादनाच्या विरोधात सोमवारी सकाळी अकरा वाजता शेतकऱ्यांच्या वतीने वतीने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन पवन दत्ता या अधिकाऱ्या विरोधात काय कारवाई केली याची विचारणा करणे व त्या नंतर मुंगसरा येथे आजीबाई व महिलांवर अत्याचार झाला होता त्यांच्या घरासमोर तीन तास आत्मक्लेश आंदोलन करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला . विल्होळी येथे बाधित शेतकरी यांची बैठक संपन्न झाली या वेळी व्यासपिठावर प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेचे नेते साहेबराव दातीर , कैलास खांडबहाले, करण गायकर, भास्कर उगले, विष्णू कोकणे ,संतोष सहाणे, दौलत चुंबळे, सुदर्शन पाटील आदी उपस्थित होते. बैठकीत आठ ठराव मंजूर करण्यात आले . यात पुढील आंदोलनाची दिशा. नाशिक जिल्हाधिकारी कार्यालय अथवा रामकुंड गंगा गोदावरी या ठिकाणी सर्व बाधित शेतकरी मिळून आंदोलन करण्याचा ठराव तसेच कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या जळगाव येथील घरावर नाशिक ते जळगाव अर्ध नग्न मोर्चा काढून सर्व बाधित शेतकऱ्यांचे मागण्या बाबत विचारणा करणे यांचा समावेश आहे. यात नाशिक जिल्ह्यात जिल्हा प्रशासनाच्या वतीने कुंभमेळ्याच्या नावाखाली बळजबरीने बेकायदेशीर होणाऱ्या भूसंपादनाबाबत सर्व शेतकरी यांना एकत्रित करून लोकशाही व कायदेशीर मार्गाने लढा उभारणे. प्रत्येक बाधित गावात राजकारण विरहित पाच शेतकरी मुलांना शेतकरी संघर्षाकामी प्रशिक्षणाची सोय करणे.पुढील काळात बाधित शेतकऱ्यांचा संघर्ष तीव्र होणार असल्याने कायदेशीर मार्गदर्शना साठी शेतकरी वकील मुलांची निवड करून तज्ञांचे मार्गदर्शन घेणे. -राजकीय पुढारी जिल्हा प्रशासन भूमाफिया व बिल्डर यांच्या अभद्रयुतीमुळे अनेक शेतकरी उध्वस्त झालेले आहेत, परिणामी या शेतकऱ्यांना कोणीही आधार नसल्याने सर्व शेतकरी मिळून ही अभद्र युती तोडण्या कामी व शेतकऱ्यांना सावरण्यासाठी एकत्रित काम करून यांच्या विरोधात तीव्र लढा उभारणे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

**निविदा सुचना क्र. १० सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, दादाभाई मार्ग, भवन्स कॉलेज जवळ अंधेरी (प) मुंबई-४०००५८ (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र दिनांक- **१९/५/२०२६** ते दिनांक- **२६/५/२०२६** कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. तसेच दिनांक- **२७/५/२०२६** दुपारी १७/- वाजेपर्यंत निविदा स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दीवशी निविदा उघडण्यात येतील निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | फोर्स वन मुख्यालय, गोरेगांव (पूर्व) मुंबई येथील प्रशासकिय इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील प्रसाधनगृहामध्ये गळतीप्रतिबंधक कामे व इतर स्थापत्य कामे करणे. | रु.८३९११०/- |
| २ | मुळगांण कामांतर्गत एमआयडीसी पोलीस ठाणे, अंतर्गत हंजर नगर, पंपहाऊस पोलीस निवासस्थान "सी" इमारत येथील अंतर्गत प्लास्टर पेटींग (समोरील व एल.एच.एस) इ. स्थापत्य कामे करणे. | रु.८४३५२५/- |
| ३ | मुळगांण कामांतर्गत एमआयडीसी पोलीस ठाणे, अंतर्गत हंजर नगर, पंपहाऊस पोलीस निवासस्थान "यु" इमारत येथील अंतर्गत प्लास्टर पेटींग इ. स्थापत्य कामे करणे. | रु.८४३६३८/- |
| ४ | वांद्रे पोलीस ठाणे व अटक कोठडी हिल रोड, वांद्रे (प), मुंबई येथे ड्रेनेज लाइनची दुरुस्ती करणे. | रु.८०७६५९/- |
| ५ | ४८ पोलीस कर्मचारी निवासस्थाने, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), सी इमारत येथे पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती करणे. | रु.८४३४६८/- |
| ६ | मुळगांण कामांतर्गत एमआयडीसी पोलीस ठाणे, अंतर्गत हंजर नगर, पंपहाऊस पोलीस निवासस्थान "सी" इमारत येथील अंतर्गत प्लास्टर पेटींग (मागील बाजूस) इ. स्थापत्य कामे करणे. | रु.८४३७०५/- |
| ७ | ४८ पोलीस कर्मचारी निवासस्थाने, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), डी इमारत येथे पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती करणे. | रु.८४२४६७/- |
| ८ | ५४ पोलीस कर्मचारी निवासस्थाने, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), ए इमारत येथे पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती करणे. | रु.८०१६००/- |
| ९ | मुळगांण कामांतर्गत एमआयडीसी पोलीस ठाणे, अंतर्गत हंजर नगर, पंपहाऊस पोलीस निवासस्थान "यु" इमारत येथील अंतर्गत प्लास्टर पेटींग (समोरील व आर.एच.एस) इ. स्थापत्य कामे करणे. | रु.८४३६८३/- |
| १० | २१ पोलीस कर्मचारी निवासस्थाने, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), बी इमारत येथे पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती करणे. | रु.७१४२२१/- |
| ११ | ६ सफाई कर्मचारी निवासस्थाने, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), जी इमारत येथे पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती करणे. | रु.७००९०९/- |
| १२ | मुळगांण कामांतर्गत एमआयडीसी पोलीस ठाणे, अंतर्गत हंजर नगर, पंपहाऊस पोलीस निवासस्थान "सी" इमारत येथील टेरेस वॉटरप्रुफींग करणे. | रु.८४३९५६/- |
| १३ | ४८ पोलीस कर्मचारी निवासस्थाने, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), इ इमारत येथे पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती करणे. | रु.८४३७९७/- |
| १४ | ३२, पोलीस उप निरिक्षक निवासस्थाने, इमारत क्र. १ कार्टर रोड, वांद्रे (प), मुंबई येथे वॉटर फ्रुफींग करणे. | रु.८४३४७४/- |
| १५ | मुळगांण कामांतर्गत एमआयडीसी पोलीस ठाणे, अंतर्गत हंजर नगर, पंपहाऊस पोलीस निवासस्थान "यु" इमारत येथील अंतर्गत प्लास्टर पेटींग (मागील बाजूस व एल.एच.एस) इ. स्थापत्य कामे करणे. | रु.८४३५८५/- |
| १६ | मुळगांण कामांतर्गत एमआयडीसी पोलीस ठाणे, अंतर्गत हंजर नगर, पंपहाऊस पोलीस निवासस्थान "सी" इमारत येथील जिन्याचे व बाहय भागावे नुतनीकरण करणे. | रु.८४३६४२/- |
| १७ | ४० पोलीस कर्मचारी निवासस्थाने, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), एफ इमारत येथे पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती करणे. | रु.८४३१४१/- |
| १८ | पोलिस सहआयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, समता नगर कांदीवली येथील तळमजल्यावरील प्रसाधनगृहाचे नुतनीकरण करणे. | रु.८४३१८७/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/२९०५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :-१२/०५/२०२६

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

आरओसी - 2026-27/क्र- 5/C८५१

**महाराष्ट्र शासन**
*सार्वजनिक बांधकाम विभाग*
*"ड" - निविदा सूचना क्र.०९ /२०२६-२७*

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी **अनुभवी पुरवठादार/कंत्राटदार** यांचे कडून **"ड-नमुन्यातील"** निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई, यांचे कार्यालयातून **दिनांक१८ .०५.२०२६ ते२५.०५.२०२६** पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई, भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा **दिनांक२६ .०५.२०२६** पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ.क्र | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | CR to MLA's Hostel Mumbai. Supplying Housekeeping material at Ground floor to 3rd floor for march session 2026. (MA 34330) | ८,०१,५५६/- | ८५००/- | ३ महिने | "ड" | ५९०/- |
| २. | Providing genral pest control service to GB Devgiri, Ramtek, Sevasadan, shivgiri, Meghdoot, Sagar, Chief Justice house, rocky hill bldg. Bandmans qrts, Avanti- amber bldg rocky hill tower, Nilima bldg at N.D. road, Malbar hill, Mumbai. (WN 34383) | ८,४२,७०३/- | ८५००/- | १ वर्ष | "ड" | ५९०/- |
| ३. | MOW to New Council Hall Building at Mumbai – Providing and Erecting mandap and seating arrengment on hire basis for BJP party office luch in session period at 2nd floor terrace at NCH at Mumbai. (MN 34327) | २,०२,८५७/- | २५००/- | १ महिना | "ड" | ५९०/- |
| ४. | Providing and erection of waterproof mandap roof upto 15ft hieght, PVC chairs, Dunlop sofa, leather sofa, folding table of size 4x2' wash basin, VIP chair, white partition, wooden stage, round and canopy for govt. bunglow Shivgiri under N.D. road section at N.D. road, Mumbai. (WN 34118) | ८,४२,९१३/- | ८५००/- | १ महिना | "ड" | ५९०/- |
| ५. | Providing and erection of waterproof mandap roof upto 15ft hieght, PVC chairs, Dunlop sofa, leather sofa, folding table of size 4x2' wash basin, VIP chair, white partition, wooden stage, round and canopy for govt. bunglow Ramtek under N.D. road section at N.D. road, Mumbai. (WN 34116) | ८,४२,९७०/- | ८५००/- | १ महिना | "ड" | ५९०/- |
| ६. | Providing and erecting of waterproof mandap roof upto 15ft high, PVC chair, dunlop sofa, leather sofa, folding table of size 4x2, wash basin, VIP chair, white partition, wooden stage, round table and cnopy for govt bunglow Sevasadan under N.D. road, Mumbai. (WN 33966) | ८,४०,१११/- | ८५००/- | १ महिना | "ड" | ५९०/- |
| ७. | MOW to New Council Hall Building at Mumbai – Providing and supplying chair at CM office at ground at vidhan bhavan Mumbai. (MN 34515) | ३,०८,३५६/- | ३५००/- | ७ दिवस | "ड" | ५९०/- |
| ८. | Providing and erecting of waterproof mandap roof upto 15ft high, PVC chair, dunlop sofa, leather sofa, folding table of size 4x2, wash basin, VIP chair, white partition, wooden stage, round table and cnopy for govt. bunglow Meghdoot under N.D. road, Mumbai. (WN 33962) | ८,३८,५५९/- | ८५००/- | १ महिना | "ड" | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

जा.क्र. काअ/इशवि/भांडार/डी-निविदा/ ४७०९
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,
इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन,२ रा मजला,
२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दुरध्वनी क्र.२२०१६९७५ / २२०१६९७३
ई-मेल - presidency.ee@mahapwd.com
दिनांक :-१३.०५.२०२६.

(वि.अ.पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.


आरओसी - 2026-27/क्र- 5/C८१६

# ‘राजा शिवाजी’ने इतिहास रचला; रितेश देशमुखच्या सिनेमाने पार केला १०० कोटींचा टप्पा



■ **वृत्तसंस्था :** अभिनेता आणि दिग्दर्शक रितेश देशमुखचा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक चित्रपट ‘राजा शिवाजी’ सध्या बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करताना दिसत आहे. चित्रपटाने रिलीजच्या तिसऱ्या आठवड्यातही थिएटरमध्ये आपली पकड कायम ठेवली असून आता या सिनेमाने एक मोठा टप्पा गाठला आहे. १ मे २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने तिसरा वीकेंड पूर्ण करताना १०० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. अहवालानुसार, चित्रपटाचे भारतातील एकूण ग्रॉस कलेक्शन १००.०७ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. तर नेट कलेक्शन ८४.५५ कोटी रुपये झाले आहे. १७ व्या दिवशी म्हणजेच तिसऱ्या रविवारी ‘राजा शिवाजी’ने २,२२३ शोमधून ३.४५ कोटी रुपयांची कमाई केली. यामध्ये हिंदीने ५५ लाख रुपये कमावले, तर मराठीने तब्बल २.९० कोटी रुपयांची कमाई केली. यावरून चित्रपटाला महाराष्ट्रात प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचं स्पष्ट दिसत आहे. पहिल्या आठवड्यात चित्रपटाने ५२.६५ कोटी रुपयांची कमाई केली होती. यामध्ये हिंदी व्हर्जनचा वाटा १६.४० कोटी रुपये, तर मराठीचा वाटा ३६.२५ कोटी रुपये होता. दुसऱ्या आठवड्यात चित्रपटाने आणखी २४.३० कोटी रुपये कमावले. विशेष म्हणजे तिसऱ्या आठवड्यातही सिनेमाच्या कमाईत स्थिरता दिसत आहे. ‘राजा शिवाजी’ चित्रपटाबद्दल एक रंजक माहिती समोर आली आहे. या सिनेमात काम करणाऱ्या मोठ्या कलाकारांनी कोणतीही फी घेतलेली नाही. एका मुलाखतीत रितेश देशमुखने सांगितलं की, “या चित्रपटातील सर्व मोठ्या कलाकारांनी मोफत काम केलं आहे. सर्वांनी महाराजांसाठी काम केलं.” या चित्रपटात केवळ अभिनयच नाही, तर कथा लेखन आणि दिग्दर्शनाची जबाबदारीही रितेश देशमुखने सांभाळली आहे. या चित्रपटात संजय दत्त, अभिषेक बच्चन, विद्या बालन, सचिन खेडेकर, फरदीन खान, जेनेलिया देशमुख, भाग्यश्री आणि अमोल गुप्ते यांसारखे दिग्गज कलाकार झळकत आहेत. याशिवाय जितेंद्र जोशी, मुस्ताक शेख, अशोक समर्थ आणि सुरेश विश्वकर्मा यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, आगामी दिवसांत हा सिनेमा आणखी कोणते विक्रम मोडतो याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

# त्रिशा कृष्णनच्या चित्रपटाने ३ दिवसांत कमावले तब्बल ‘इतके’ कोटी



■ **वृत्तसंस्था :** दाक्षिणात्य अभिनेत्री त्रिशा कृष्णन गेल्या काही दिवसांपासून अनेकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे. अभिनेते आणि तमिळनाडूचे नवीन मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्याबरोबरच्या मैत्रिमुळे त्रिशाबद्दल अनेक चर्चा सुरू आहे. पण सध्या अभिनेत्री फक्त तिच्या खासगी आयुष्यामुळे नाही तर तिच्या व्यावसायिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. त्रिशाच्या नुकत्याच रिलीज झालेल्या चित्रपटाला प्रेक्षकांचा तुफान प्रतीसाद मिळत आहे. त्रिशा कृष्णनने आतापर्यंत अनेक लोकप्रिय अभिनेत्यांसह काम करत सुपरहिट चित्रपट दिले आहेत. नुकताच तिचा व लोकप्रिय दाक्षिणात्य अभिनेता सूर्याचा ‘करुप्पू’ हा ॲक्शन थ्रिलर चित्रपट प्रदर्शित झाला. याच चित्रपटासाठी जोसेफ विजय यांनी एक महत्त्वाचा निर्णयसुद्धा घेतला होता आणि आता या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतीसाद मिळत असून बॉक्स ऑफिसवर चित्रपट कोट्यवधी कमावत आहे. आर.जे.बालाजी दिग्दर्शित सूर्या व त्रिशा यांचा ‘करुप्पू’ हा चित्रपट १५ मे रोजी चित्रपटगृहात रिलीज झाला. यामध्ये त्रिशा व सूर्या वकिलाच्या भूमिकेत पाहायला मिळत आहेत. या चित्रपटाच्या कमाईबद्दल बोलायचं झालं तर रिलीजच्या पहिल्याच दिवशी काही अडचणी आणि समीक्षकांकडून संमिश्र प्रतिक्रिया मिळूनही, हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरला आहे. रिलीज झाल्यानंतर अवघ्या तीन दिवसांतच चित्रपटाने जगभरात १०० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. ट्रेड रिपोर्टनुसार, ‘करुप्पू’ने रिलीजच्या पहिल्या वीकेंडमध्ये भारतात सुमारे ६८ कोटी रुपयांचं नेट कलेक्शन केलं. या चित्रपटाने भारतात एकूण ७८.७५ कोटी रुपये, तर परदेशातून जवळपास ४२ कोटी रुपयांची कमाई केली आहे. त्यामुळे रिलीजच्या पहिल्याच वीकेंडमध्ये चित्रपटाची जगभरातील एकूण कमाई अंदाजे १२०.७५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. चित्रपटासाठी पहिला वीकेंड दमदार ठरला आहे. शुक्रवारी रिलीज झालेल्या ‘करुप्पू’ने भारतात १५.५० कोटी रुपयांचं नेट कलेक्शन केलं. त्यावेळी थिएटर्समध्ये सुमारे ४७ टक्के ऑक्युपन्सी होती. शनिवारी प्रेक्षकांची गर्दी आणखी वाढली आणि चित्रपटाने २४.१५ कोटी रुपयांची कमाई केली. रविवारी तर चित्रपटाने आतापर्यंतची सर्वाधिक कमाई करत जवळपास २८.३५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. चित्रपटाच्या प्रदर्शनाआधी आलेल्या अडचणी पाहता त्याची बॉक्स ऑफिसवरील कमाई आणखीच खास मानली जात आहे. ‘करुप्पू’ हा चित्रपट १४ मे रोजी रिलीज होणार होता, मात्र निर्मात्यांना आलेल्या आर्थिक अडचणींमुळे काही शो शेवटच्या क्षणी रद्द करण्यात आले. समस्या सुटल्यानंतर हा चित्रपट १५ मे रोजी थिएटर्समध्ये प्रदर्शित झाला. असं असतानाही चाहते सिनेमागृहांमध्ये चित्रपट पाहण्यासाठी गर्दी करत आहेत. या चित्रपटात सूर्याने सरवनन नावाच्या वकिलाची भूमिका साकारली आहे, जो पुढे शक्तिशाली गावदेवता करुप्पुस्वामीच्या रूपात दिसतो. एका असहाय्य वडिलांवर आणि त्यांच्या मुलीवर झालेल्या अन्यायाची ही कथा आहे. चोरीच्या घटनेनंतर ते भ्रष्ट न्यायव्यवस्थेच्या जाळ्यात अडकतात. फँटसी, कोर्टरूम ड्रामा आणि ॲक्शनचा मिलाफ या चित्रपटात पाहायला मिळतो. दरम्यान, त्रिशाचा हा सिनेमा प्रदर्शित होण्यापूर्वी मंगळवारी १२ मे रोजी जोसेफ विजय यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला होता. त्यांनी या चित्रपटाच्या सकाळी ९च्या शोसाठी विशेष परवांगी दिली होती. एसआर प्रभू आणि एसआर प्रकाशबाबू यांच्या Dream Warrior Pictures या निर्मिती संस्थेच्या अधिकृत एक्स हँडलवरून मुख्यमंत्री कार्यालयात काम करत असलेल्या जोसेफ विजय यांचा फोटो शेअर करण्यात आला. त्याबरोबर ‘करुप्पू’ चित्रपटाच्या सकाळी ९ वाजताच्या शोसाठी विशेष परवानगी दिल्याची माहिती देण्यात आली. परंतु, असं असतानाही काही कारणामुळे या चित्रपटाचे सकाळी ९चे शो रद्ध झाले होते. स्वत: दिग्दर्शकाने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत याबद्दल खेद व्यक्त केला होता.

# आम्हा बिहाऱ्यांची काळजी घ्या” - शेखर सुमन यांनी उपस्थित केला मराठी वाद, नितीन गडकरी म्हणाले: “तुम्हीही बिहारी आहात !”

**चौदा वर्षांनंतर शेखर सुमन नव्या लेट-नाईट टॉक शो ‘शेखर टुनाईट’सह पुनरागमन करत असून, पहिल्याच भागात त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्यासोबत एक दुर्मीळ आणि मनमोकळा संवाद साधला आहे.**




■ **वृत्तसंस्था :** चौदा वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर शेखर सुमन ‘शेखर टुनाईट’सह पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. यावेळी ते यूट्यूबवरून प्रेक्षकांसमोर येत असून, त्यांच्या खास शैलीतील मनापासूनचे संवाद, धारदार विनोद आणि प्रभावी दृष्टिकोन सादर करत आहेत. या नव्या आणि उत्साहपूर्ण पर्वाची सुरुवात करताना, पहिल्या भागात त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांचे स्वागत केले आहे. या सखोल आणि विचारप्रवर्तक संवादात गडकरी यांनी भाषा, राजकारण, सार्वजनिक जबाबदारी आणि ‘विविधतेत एकता’ या संकल्पनेचे महत्त्व यावर मनमोकळेपणाने भाष्य केले. महाराष्ट्र आणि मराठी भाषेबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की राज्याबाहेर राहिल्यावर त्यांना मराठी संस्कृती आणि ओळखीचे खरे महत्त्व जाणवले. याबद्दल बोलताना नितीन गडकरी म्हणाले, “आपल्याला मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी नाटक, मराठी साहित्य, मराठी गाणी आणि अरुण तसेच श्रीधर फडके यांसारख्या कवींचा अभिमान आहे. मी महाराष्ट्राबाहेर अधिक वेळ घालवू लागलो, तेव्हा मला मराठीचे खरे महत्त्व समजले. विविधतेत एकता ही आपली खासियत आहे आणि ती अतिशय सुंदर गोष्ट आहे.” संवादादरम्यान शेखर सुमन यांनी अलीकडील मराठी भाषेवरील वादाचा उल्लेख करत म्हणाले, “मराठीबद्दल बोलायचे झाले तर अलीकडे असा आदेश देण्यात आला होता की ज्यांना मराठी बोलता येत नाही त्यांना स्कूटर किंवा रिक्षा चालवण्याची परवानगी दिली जाणार नाही. त्या बिचाऱ्या लोकांना भीती वाटू लागली आणि आमच्यासारखे बिहारी लोक तर आणखीच चिंतेत पडले, सर. कृपया आमच्या बिहाऱ्यांची काळजी घ्या.” यावर उत्तर देताना नितीन गडकरी म्हणाले, “तुम्हीही बिहारी आहात. तुम्हाला एक गोष्ट सांगतो—बिहार राज्य झाल्यानंतर आम्ही गंगेवर सर्वाधिक पूल आणि रस्ते बांधले आणि बिहारचे संपूर्ण चित्र बदलून टाकले. जर आम्ही बिहाऱ्यांच्या विरोधात असतो, तर हे सगळं कसं केलं असतं? पण नंतर त्यांनी तो निर्णय मागे घेतला. आम्ही असेही म्हटले की दुसरे कोणतेही काम उरले नाही आणि मला रिक्षा चालवावी लागली, तर मीही मराठी शिकेन. कारण भाषा येत नसेल, तर काम गमवावे लागू शकते. प्रत्येक भाषेला तिच्या साहित्याचा आणि संस्कृतीचा अभिमान असावा, पण तो अभिमान कधीही अतिरेकी किंवा हटवादी होऊ नये.” ते पुढे म्हणाले, “राजकारण म्हणजे केवळ सत्तेचे राजकारण नाही. ते तडजोडी, बंधने, मर्यादा आणि विरोधाभास यांचा खेळ आहे. दुर्दैवाने, अनेक वेळा लोकांना जे त्रासदायक वाटते किंवा राग आणते, त्यासाठी राजकीय पक्ष किंवा नेत्यांपेक्षा जनतेचीच अधिक जबाबदारी असते. ज्या दिवशी जनता ठरवेल की काय स्वीकारायचे आणि काय नाकारायचे—उदाहरणार्थ, चुकीचे राजकारण करणाऱ्यांना मतदान न करण्याचा निर्णय घेतला—त्या दिवशी बदल सुरू होईल. लोकांनी ठामपणे पुढे आले, तर संपूर्ण राजकीय व्यवस्था बदलू शकते.” आपल्या तत्त्वांबद्दल आणि सार्वजनिक जीवनातील दृष्टिकोनाबद्दल बोलताना गडकरी म्हणाले, “मी तीन वेळा संसदेत निवडून आलो आहे आणि एका टप्प्यानंतर माझ्या तत्त्वांशी आणि मूल्यांशी तडजोड न करण्याचा निर्णय घेतला. एक काळ असा होता की महाराष्ट्रात जातीय चळवळी खूप सक्रिय होत्या, आणि त्या वेळी मी सार्वजनिकपणे म्हटले होते, ‘जो कोणी जातीय राजकारण करेल, त्याला मी कठोर विरोध करेन.’ मला त्याचा काही फरक पडला नाही, कारण माझ्या मतदारसंघातील प्रत्येक व्यक्ती—त्यांनी मला मत दिले असो वा नसो—माझीच आहे आणि मी सर्वांसाठी समान काम करेन. माझा संपूर्ण मतदारसंघ हेच माझे कुटुंब आहे. जात, धर्म, श्रद्धा, भाषा किंवा लिंग यांच्या आधारावर मी कधीही भेदभाव करणार नाही.” अध्ययन सुमन यांनी निर्मिती केलेला आणि धर्मेश सांगाणी निर्मित हा शो, शेखर सुमन यांची खास विनोद, प्रामाणिकपणा आणि भावनिकतेची शैली पुन्हा प्रेक्षकांसमोर घेऊन येतो—जी प्रेक्षकांना दशकभरापासून मिस होत होती. प्रभावी पाहुणे, मनाला भिडणारे क्षण आणि शेखर सुमन त्यांच्या खास अंदाजात— ‘शेखर टुनाईट’ हा केवळ पुनरागमन नाही, तर एक वेगळा अनुभव ठरणार आहे. दर शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता, यूट्यूबवर ‘शेखर टुनाईट’पाहायला विसरू नका

# सूर्यकुमारच्या कॅप्टन्सीची दोरी गौतम गंभीरच्या हातात




■ **वृत्तसंस्था :** सूर्यकुमार यादवनंतर भारतीय टी २० संघाचा कर्णधार कोण या प्रश्नाचं उत्तर बीसीसीआय लवकरच शोधण्याची शक्यता आहे. ३५ वर्षाचा सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या वर्षीचा टी २० वर्ल्डकप जिंकला होता. आता बीसीसीआय मंगळवारी होणाऱ्या बैठकीत सूर्यकुमारचा उत्तराधिकारी कोण याबाबत अनौपचारिक चर्चा करण्याची शक्यता आहे. १९ मे रोजी बीसीसीआय गुवाहाटीमध्ये एक महत्वाची बैठक करणार आहे. पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार कर्णधार सूर्यकुमार यादव याच्या भविष्याबाबत देखील चर्चा होण्याची शक्यता आहे. याबाबत मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरचा सल्ला घेतला जाणार आहेत. अफगाणिस्तानिरूद्ध होणाऱ्या एकमेव कसोटी आणि त्यानंतर वनडे मालिकेसाठी संघ निवड केली जाणार आहे. यासाठी मंगळावारी बैठक बोलावण्यात आली आहे. या दौऱ्यात जरी टी २० सामने नाहीत तरी देखील बैठकीदरम्यान बीसीसीआय सचिव देवजीत सैकिया टी २० कर्णधार सूर्युकमारच्या भविष्याबाबत अनौपचारिक चर्चा करण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार सूर्यकुमार यादवची कर्णधार म्हणून भविष्य काय असे हे ठरवण्यामध्ये प्रमुख कोच गौतम गंभीरची मुख्य भूमिका असणार आहे. पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार जर सूर्यकुमार यादवला कॅप्टन्सीवरून हटवण्यात आले तर फलंदाज म्हणूनही त्याची संघातील जागा धोक्यात येण्याची शक्यता आहे. याबाबत सर्वात सुरक्षित पर्याय म्हणजे त्याला आयर्लंड आणि इंग्लंड विरूद्धच्या टी २० मालिकेत कॅप्टन्सीची संधी दिली जाईल. या मालिकेत त्याच्या फलंदाजीच्या कामगिरीच्या आधारे त्याच्या भविष्याचा निर्णय घेतला जाईल. मात्र हा सुरक्षित पर्याय निवड समिती मान्य करेल याची काही शाश्वती नाही. सूर्यकुमारसाठी २०२५ हे वर्ष वाईट केलं आहे. त्याला संपूर्ण वर्षात फलंदाजीत संघर्ष करावा लागला आहे. मात्र २०२६ मधील वर्ल्डकपमध्ये त्याने फॉर्म परत मिळवला. सूर्यकुमारने २०२५ मध्ये २१ सामन्यात फक्त २१८ धावा केल्या होत्या. संपूर्ण वर्षात त्याला अर्धशतकही झळकावता आले नाही. त्याने १३.६२ च्या सरासरीने धावा केल्या. त्याचा स्ट्राईक रेट १२३.१६ इतकी होती. मात्र २०२६ मध्ये त्याने फॉर्म परत मिळवला. आतापर्यंत त्याने १४ आंतरराष्ट्रीय टी २० सामन्यात ४ अर्धशतकांसह ४८४ धावा केल्या आहेत. त्याची सरासरी ४४ तर स्ट्राईक रेट १६१.३३ होता. सूर्याचे टी २० कर्णधारपदाचे रेकॉर्ड शानदार आहे. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने आतापर्यंत ५२ सामने खेळले आहेत.

# दारु पिण्याचा थेट ६२ आजारांशी थेट संबंध!



■ **वृत्तसंस्था :** थोडी दारु पिली तर चालते, असा तुमचा समज असेल तर नवीन संशोधन हा समज दुरु करणारा ठरला आहे. कारण सुशिक्षित वर्गात ‘स्टेटस सिम्बॉल’ मानले जाणारे दारु पिणे थेट कॅन्सरसह ६२ आजारांना आमंत्रण देत असल्याचा धक्कादायक खुलासा एका नवीन संशोधनातून करण्यात आला आहे. दारुचा शौक केवळ यकृतालाच नाही, तर थेट कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजारांनाही निमंत्रण देत असल्याचे नवीन संशोधनात स्पष्ट झाले आहे. ‘ॲडिक्शन’ या प्रसिद्ध वैद्यकीय जर्नलमध्ये १३ मे रोजी ‘मद्यपानाचे प्रमाण आणि आजारांचा धोका’ या विषयावर एक शोधनिबंध प्रसिद्ध झाला आहे. या रिपोर्टमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, दारूचा (मद्यपानाचा) थेट संबंध तब्बल ६२ आजारांशी जोडला गेला आहे. या संशोधनात अशा ५० हून अधिक आजारांची यादीच समोर आली आहे, जे केवळ आणि केवळ दारू पिण्यामुळेच होतात. यात वेगवेगळ्या प्रकारचे कॅन्सर, पोटाचे विकार, टीबीसारखे संसर्गजन्य आजार आणि हृदयाच्या गंभीर आजारांचा समावेश आहे. या अभ्यासानुसार, दारूमुळे आपल्या शरीरातील हार्मोन्स बिघडतात, अन्नाचे पचन नीट होत नाही, शरीराला पोषक तत्व मिळत नाहीत आणि मानसिक आरोग्य बिघडून माणसाचे वागणे-बोलणेही बदलू लागते, असेही अभ्यासात नमूद केले आहे. दारू पिण्यामुळे केवळ शरीराची आजारांशी लढण्याची ताकद (प्रतिकारशक्ती) कमी होत नाही, तर कॅन्सरसारखे आणि इतर कधीही न बरे होणारे मोठे आजार होण्याचा धोका प्रचंड वाढतो. अमेरिकेतील हृदयविकार तज्ज्ञ डॉ. अँड्रयू फ्रीमन यांनी ‘सीएनएन’शी बोलताना सांगितले की, “आपण हातावरील किंवा जखमेवरील जंतू मारण्यासाठी सॅनिटायझर किंवा जंतुनाशक वापरतो, त्यात ‘अल्कोहोल’ (दारूचा अंश) असतो. विचार करा, अल्कोहोल जंतूंना मारण्यासाठी वापरले जाते, ते मुळातच एक प्रकारचे विष आहे. अल्कोहोल जंतू मारू शकते, तर ते आपल्या शरीरासाठी कसे चांगले असेल? म्हणूनच, दारू कितीही कमी प्रमाणात प्यायली तरी ती सुरक्षित आहे का, हाच खरा मोठा प्रश्न आहे.” ‘ॲडिक्शन’ जर्नलमध्ये प्रकाशित शोधनिबंधाच्या लेखकांपैकी एक डॉ. ज्युर्गेन रेहम यांनी स्पष्ट केले की, ६२ प्रकारचे आजार होण्यासाठी दारु पिणे हे एक प्रमुख कारण आहे. दारु नसती तर हे आजार जगात अस्तित्वातच नसते. असे आणखी ३० आजार आहेत ज्यात अल्कोहोलची भूमिका असते, स्तनाचा आणि इतर कर्करोग, हृदयरोग, पक्षाघात, मधुमेह आणि स्मृतिभ्रंश, यासाठी दारु पिणे हेच कारण ठरते. ज्युर्गेन रेहम यांनी ‘अल्कोहोलचा वापर आणि मद्यपीपणाशी संबंधित धोके’ (२०११) नावाच्या अभ्यासाचा हवाला देत ‘हेवी ड्रिंकिंग’ची व्याख्या स्पष्ट केली आहे. महिलांसाठी: दिवसाला ४० ग्रॅमपेक्षा जास्त शुद्ध अल्कोहोल (साधारण ४१ मिली किंवा १.४ औंस दारू) पिणे म्हणजे अति मद्यपान आहे. तर पुरुषांसाठी हेच प्रमाण दिवसाला ६० ग्रॅमपेक्षा जास्त शुद्ध अल्कोहोल (साधारण ६२ मिली या २.१ औंस दारू) पिणे म्हणजे अति मद्यपान आहे. ज्युर्गेन रेहम यांनी स्पष्ट केले की, “दारूमुळे शरीराचे होणारे नुकसान आपण वेळीच रोखू शकतो आणि ते पूर्ववत देखील करू शकतो. रोगप्रतिकारक शक्तीवर होणारे मद्यपानाचे तात्काळ परिणाम फार काळ टिकत नाहीत. तुम्ही दारू पिणे किती प्रमाणात सोडता यावर ते अवलंबून आहे. दारू पूर्णपणे बंद केल्यास अवघ्या काही दिवसांत ते एका आठवड्यात आपले शरीर पुन्हा पूर्वपदावर येऊ लागते.”

**महाराष्ट्र शासन**
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
**ई -निविदा सुचना क्र. १३ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रंमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) हे सक्षम व अनुभवी कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. |
| --- | --- | --- |
| १ | मलबार हिल मुंबई येथील प्लॉट नं. २५१ आवारातील इमारतीचे मजबुतीकरण करणे, विश्रांतीगृह नुतनीकरण करणे. (भाग - २) | २,४३,९८,९१९/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. १८.५.२०२६ ते दि. २५.५.२०२६ पर्यंत

निविदा पूर्व बैठक- दि. २०.५.२०२६ (बैठकिचे ठिकाण अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय, ५ बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ वेळ : ३.०० वाजता)

ई-निविदा उघडणे- दि. २६.५.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता

निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल. खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ ४७६३
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : १३/५/२०२६

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र- 5/C८२०

# इस्टेटीच्या वादातून सख्या भावाकडून भावाची सुपारी देऊन हत्या

## गणेशपुरी पोलीसांची कौशल्यपूर्ण तपासणी; मुख्य सूत्रधारासह चार आरोपी जेरबंद

**भिवंडी (विशेष प्रतिनिधी) :** भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या एका थरारक आणि क्रूर घटनेने परिसर हादरला असून, वडिलोपार्जित इस्टेटीच्या वादातून सख्ख्या भावानेच भावाचा कायमचा काटा काढल्याचे उघड झाले आहे. मौजे-शेडगाव येथील रहिवासी परेश टोलाराम पाटील (वय ४०) यांच्या खुनामागे त्यांचाच भाऊ नरेश टोलाराम पाटील (वय ३७) हा मुख्य सूत्रधार असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परेश आणि नरेश या दोघा भावांमध्ये वडिलोपार्जित इस्टेटीच्या कारणावरून दीर्घकाळ वाद सुरू होता. या वादाने अखेर गंभीर वळण घेत नरेशने आपल्या भावाच्या हत्येची सुपारी दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.



दि. १२ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ८.४५ वाजण्याच्या सुमारास परेश पाटील हे नेहमीप्रमाणे आपल्या मोटारसायकलवरून वसई येथे कामावर जाण्यासाठी घरातून निघाले होते. घरापासून काही अंतरावरच अज्ञात मारेकऱ्यांनी त्यांना रस्त्यात अडवून डोक्यावर व हनुवटीवर धारदार हत्याराने प्राणघातक वार केले. या हल्ल्यात परेश यांचा जागीच मृत्यू झाला. घटना घडल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले होते. या प्रकरणी सुरुवातीला मयत परेश यांचा भाऊ नरेश टोलाराम पाटील यांनीच गणेशपुरी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती. मात्र तपासादरम्यान पोलिसांना संशयास्पद बाबी आढळून आल्या. ठाणे ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल आणि गणेशपुरी विभागाचे पोलीस उपअधीक्षक राहुल झाल्टे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गिते व पोलीस निरीक्षक कमलेश बच्छाव यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश कदम, रोहन शेलार, भाऊसाहेब गायकवाड, शरद सुरळकर, उमेश खिरड, मयूर शेवाळे आणि निरंजन पाटील यांच्या पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली. तपासादरम्यान पोलिसांनी तब्बल २०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी मौजे-विलंगी, केळवा, ता. जि. पालघर येथून राकेश भगवान पाटील (वय ३७), प्रेमजित मधुकर घरत (वय ३८) आणि दक्षत भानुकांत भोईर (वय २४) या तिघांना ताब्यात घेतले. कौशल्यपूर्ण चौकशीत आरोपींनी धक्कादायक कबुली देताना सांगितले की, मयत परेश यांचा भाऊ नरेश पाटील यानेच त्यांना परेश यांची हत्या करण्यासाठी सुपारी दिली होती. या कबुलीनंतर पोलिसांनी नरेश पाटील यालाही अटक केली असून, तोच या कटाचा मुख्य सूत्रधार असल्याचे स्पष्ट झाले आहे.या प्रकरणातील चारही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. अल्पावधीत गुन्ह्याचा छडा लावल्याबद्दल गणेशपुरी पोलीस आणि ठाणे ग्रामीण पोलीस दलाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. तसेच अशा प्रवृत्तीच्या आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, ही संपूर्ण घटना केवळ इस्टेटीच्या वादातून घडल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

# उल्हासनगरमध्ये ९ लाखांहून अधिक किमतीचा गांजा जप्त


**उल्हासनगर (विशेष प्रतिनिधी) :** उल्हासनगर परिसरात सुरू असलेल्या पेट्रोलिंग दरम्यान पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ९ लाख ३५ हजार रुपयांचा गांजा, रिक्षा आणि मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त केला असून तिघा आरोपींना अटक करण्यात आली आहे. शनिवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास उल्हासनगर कॅम्प १ येथील अमरडाय कंपनीबाहेरील सार्वजनिक रस्त्यावर करण्यात आली.चेन स्नॅचिंग, मोबाईल स्नॅचिंग, घरफोडी व वाहन चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून परिसरात पेट्रोलिंग सुरू होते. त्यावेळी संशय आल्याने एमएच-०५-सीपी-५५५५ क्रमांकाची रिक्षा अडवून तपासणी करण्यात आली. तपासादरम्यान रिक्षामध्ये मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. या प्रकरणी



पोलिसांनी हिदायतुल्ला बिसमिल्ला शेख (वय ५१, रा. अंबरनाथ पश्चिम), बिकास बिकरम रणबैसा (वय २६, रा. उडीसा) आणि सुधीर धरूबा रणबैसा (वय २७, रा. उडीसा) या तिघांना ताब्यात घेतले आहे. उल्हासनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींकडून सुमारे २१ किलो ५८४ ग्राम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत ८ लाख ६३ हजार ३६० रुपये इतकी आहे. तसेच गांजाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली रिक्षा, तीन मोबाईल फोन असा एकूण ९ लाख ३५ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तपासादरम्यान हा गांजा उडीसा येथून आणण्यात आल्याचे समोर आले असून तो अंबरनाथ परिसरातील बाबू खान नावाच्या व्यक्तीस विक्रीसाठी नेण्यात येत असल्याची माहिती आरोपींनी दिल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# मुरबाडमध्ये बेकायदेशीर माती उत्खनावर तहसीलदारांची धडक कारवाई





**मुरबाड (विशेष प्रतिनिधी) :** मुरबाड तालुक्यात बेकायदेशीर माती उत्खननावर तहसीलदार अभिजित देशमुख यांनी धडक कारवाई करत पाच डंपर व दोन जेसीबी जप्त करून टोकावडे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.तालुक्यातील आदिवासी भागातील झाडघर पठार आणि माळ पठार परिसरात अनेक वर्षांपासून बेकायदेशीर माती उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत होत्या. चिरीमिरीमुळे कारवाई होत नसल्याने स्थानिक नागरिक त्रस्त झाले होते. या पार्श्वभूमीवर तहसीलदार अभिजित देशमुख यांनी कडक भूमिका घेत अचानक छापा टाकून संबंधित वाहनांवर कायदेशीर कारवाई केली.जप्त करण्यात आलेल्या वाहनांवर पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, बेकायदेशीर माती उत्खनन करणाऱ्या वाहनांवर कठोर बंदी घालण्यात येणार असल्याचे तहसीलदारांनी स्पष्ट केले आहे.

# कल्याणच्या रेल्वे यार्डात १४वर्षीय मुलीवर अत्याचार; काही तासांतच नराधम आरोपीला अटक

**डोंबिवली (विशेष प्रतिनिधी) :** कल्याण रेल्वे जंक्शनवर मामाला भेटण्यासाठी अहिल्यानगरहून आलेल्या १४वर्षीय अल्पवयीन मुलीला ब्लॅकमेल करत रेल्वे यार्डात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची अत्यंत संतापजनक घटना घडली. या मुलीने नराधमाच्या तावडीतून निसटून लोहमार्ग पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी तत्परता दाखवत पसार झालेल्या बलात्काऱ्याला अवघ्या काही तासांतच बेड्या ठोकून गजाआड केले.स्पोर्ट्स न्यूज सौरभ संतोष सोनवणे (२३) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. कल्याण पूर्वेकडील सिद्धार्थ नगरमध्ये राहणाऱ्या



सौरभला कल्याणच्या लोहमार्ग न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला अधिक चौकशीसाठी पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या संदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही १४वर्षीय मुलगी अहिल्यानगरहून मामाला भेटण्यासाठी निघाली होती. कल्याणहून तिला खोपोलीला जायचे होते. खोपोलीला जाण्यासाठी ती कल्याण रेल्वे स्थानकात ट्रेनच्या प्रतीक्षेत होती. तिच्यावर सौरभची वाईट नजर पडली. त्याने तिच्याशी जवळीक साधून बोलायला सुरुवात केली. त्याने या मुलीचा मोबाईल हिसकावून घेतला. या प्रकाराने मुलगी भयभीत झाली. तिने त्याच्याकडे मोबाईल मागितला. मोबाईल हवा असेल तर माझ्यासोबत पोलीस ठाण्यात यावे लागेल, अशी धमकी दिली. ओळखपाळख नसलेल्या या बदमाशासोबत ही मुलगी प्लॅटफॉर्मवरून चालत होती. त्यानंतर अर्ध्या वाटेत आल्यानंतर पोलीस ठाण्यात नेण्याऐवजी हा बदमाश तिला रेल्वे यार्डात घेऊन गेला. निर्जनस्थळ असलेल्या रेल्वे यार्डात नेऊन त्याने या मुलीवर लैंगिक अत्याचार केला. नराधमाच्या तावडीतून या मुलीने कशीबशी सुटका करवून घेतली आणि ती लोहमार्ग पोलीस ठाण्यात पोहोचली. स्वतःवर बेतलेल्या प्रसंगाची माहिती दिल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ कांदे यांनी तिला धीर दिला. त्यानंतर मात्र वेळ न दवडता वपोनि कांदे यांनी गुन्हा नोंदवून निवडक पथकाला आरोपीचा शोध घेण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. त्यानुसार पोलिसांनी तातडीने सीसीटीव्ही फुटेजच्या सहायाने शोधमोहीम राबवून अवघ्या काही तासांच्या आत आरोपीला शोधून काढण्यात यश मिळविले.

# संगमनेर–नाशिक दारू चोरी रॅकेट उघड; आंतरराज्य टोळीतील तिघांना अटक

**संगमनेर (विशेष प्रतिनिधी) :** संगमनेरमधील बिअरबारमध्ये चोरी केलेली दारू नाशिकच्या बारमध्ये विकल्याचा प्रकार पोलिसांनी समोर आणला. दारू चोरी करण्यासाठी नाशिकच्याच बिअरबार चालकाने वाहन उपलब्ध करून दिल्याची माहिती तपासात पुढे आली. पोलिसांनी आंतरराष्ट्रीय टोळीतील तिघांना अटक केली असून त्यांनी पाच गुन्हे केल्याची कबुली दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. हसन हमजा कुट्टी (रा. नवनाथनगर, पंचवटी, नाशिक, आकाश सचिन सुर्यवंशी (रा. दत्त चौक, सिडको, नाशिक आणि मेहताब गुलाम रसुल अन्सारी (मुळ रा.गिरटी, झारखंड) अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. त्यांचा चौथा साथीदार बंटी दास (रा.झारखंड) हा मात्र पसार



झाला आहे. चोरीची दारू विकत घेणाऱ्या किरण रामदास उगले आणि विवेक अरुण उगले यांनाही पोलिसांनी आरोपी केले असून यातील किरण उगले यास अटक करण्यात आली. किरण उगले याच्याकडून विविध कंपन्यांची चार लाखांची दारू, कार व इतर साहित्य असा साडेपाच लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. संगमनेरमधील हॉटेल निलायम बारचे शटर उचकटून विविध कंपन्याची ३ लाख ६ हजार रुपयांची विदेशी दारू तसेच सिगारेट व सीसीटिव्ही कॅमेऱ्याचा डिव्हीआर ३ मे रोजी चोरी झाला होता. किशोर बाळाजी डोके (रा. खंदरमाळवाडी ता. संगमनेर) यांनी घारगाव पोलिसांत फिर्याद दिली. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी, उपनिरीक्षक महादेव गुट्टे, अंमलदार गणेश लोंढे, विजय पवार, फुरकान शेख, बाळासाहेब गुंजाळ, योगेश कर्डिले, अमृत आढाव, महिला पोलिस सोनल भागवत, चालक महादेव भांड यांच्या पथकाने चोरट्यांचा माग शोधून काढला. अनेक ठिकाणी भेटी दिल्यानंतर व्यवसायीक कौशल्याचे आधारे ही चोरी झाल्याचा माग मिळाला. हसन हमजा कुट्टी (रा.नाशिक) याने ही चोरी केल्याची माहिती मिळताच पोलिस त्याच्या शोधासाठी नाशिकला रवाना झाले. नाशिकच्या वडाळा भागातील म्हाडा बिल्डींग येथून हसन हमजा कुट्टी, आकाश सचिन सुर्यवंशी, मेहताब गुलाम रसुल अन्सारी या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिस खाक्या दाखवताच त्यांनी चोरीची कबुली देत बंटी दासचा सहभाग असल्याची कबुली दिली. अटकेतील किरण उगलेकडून पोलिसांनी वेगवेगळ्या कंपन्यांची चार लाख रुपयांची विदेशी दारू, दीड लाखाची कार, एअर पिस्तूल असा ५ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अटकेतील आरोपींनी अहिल्यानगरच्या संगमनेरमध्ये दोन, पिंपळगाव बसवंत, वावी येथील पाच गुन्ह्याची कबुली दिली. संगमनेरच्या बारमध्ये चोरी केलेली दारू नाशिकच्या पळसे येथील हॉटेल लकी बार ॲण्ड रेस्टॉरंटचे चालक किरण रामदास उगले, विवेक अरुण उगले यांना विकल्याची कबुली अटकेतील तिघांनी दिली. चोरी करण्यासाठी विवेक उगले याने वाहन उपलब्ध करून दिल्याचे तपासात समोर आले. त्यानुसार पोलिस दोघांच्या अटकेसाठी नाशिकला पोहचले, मात्र विवेक उगले पसार झाला तर किरण उगले पोलिसांच्या हाती लागला.

# वृद्धेला दीड महिना डिजिटल अरेस्ट ठेवून १४ लाख उकळले

**छत्रपती संभाजीनगर (विशेष प्रतिनिधी) :** मनी लाँड्रिंगच्या गुन्ह्यात नाव असल्याची भीती दाखवून आणि सीबीआय व दिल्ली पोलिसांच्या नावाने खोटे व्हिडिओ कॉल करून एका ७३ वर्षीय वृद्ध महिलेकडून भामट्यांनी तब्बल १३ लाख ५० हजार रुपये उकळले. हा प्रकार ८ डिसेंबर २०२५ ते २० जानेवारी २०२६ दरम्यान जवाहर कॉलनीत घडला. या प्रकरणी शनिवारी (दि. १६) जवाहरनगर पोलिस ठाण्यात सायबर भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी शोभा जोशी (७३, रा. जवाहर कॉलनी) या शहरात एकट्याच राहतात. त्यांचा मुलगा आणि मुलगी अमेरिकेत वास्तव्यास आहेत. ८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी त्यांना एका अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सॲप कॉल आला. समोरील महिलेने स्वतःचे नाव अनन्या शर्मा सांगून, जोशी यांच्या नावे असलेल्या दुसऱ्या मोबाईल क्रमांकावरून बेकायदेशीर कामे होत असल्याची बतावणी केली. थोड्याच वेळात त्यांना दुसऱ्या क्रमांकावरून व्हिडिओ कॉल आला. कॉलवरील पोलिस गणवेषातील व्यक्तीने स्वतः चे नाव सुनील कुमार गौतम, आयपीएस अधिकारी (दिल्ली पोलिस) असे सांगितले. त्याने शोभा यांच्या बँक खात्याचा वापर करून मनी लाँड्रिंग केल्याचा बनाव रचला. विश्वासात घेण्यासाठी त्याने शोभा यांचा फोटो असलेले पासबुक आणि आधार कार्डची झेरॉक्सही व्हिडिओ कॉलवर दाखवली. तपासासाठी - दिल्लीला यावे लागेल, अन्यथा ऑनलाईन सहकार्य करा असा दम भरला. त्याने सीबीआय टीम लीडर प्रदीप सिंग यांच्या नावे पत्र लिहिण्यास सांगून दररोज व्हिडिओ कॉलद्वारे हजेरी देण्यास भाग पाडले.गुन्ह्यातून नाव कमी करण्यासाठी आणि पडताळणी पूर्ण झाल्यावर पैसे परत मिळतील असे सांगून भामट्यांनी पैशांची मागणी केली. घाबरलेल्या शोभा यांनी एफडी मोडून युको बँक आणि ए.यू. बँकेच्या खात्यांवरून एकूण १३ लाख ५० हजार रुपये ट्रान्सफर केले. फेब्रुवारी महिन्यात जोशी या अमेरिकेला मुलाकडे गेल्यावर त्यांनी हा प्रकार सांगितला. मुलाने गुगलवर शोध घेतला असता व्हिडिओ कॉलवरील व्यक्ती तोतया असल्याचे स्पष्ट झाले. फसवणूक झाल्याचे खात्रीशीर समजताच त्यांनी शहरात परतत जवाहरनगर ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. पुढील तपास पोलिस निरीक्षक सचिन कुंभार करत आहेत.

# रस्त्यावर वाहने लावल्यास आता थेट गुन्हे दाखल होणार

**सोलापूर (विशेष प्रतिनिधी) :** मंगळवेढा-सोलापूर महामार्गावरील रस्त्यावर बेशिस्तपणे उभी राहणारी वाहने आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी याकडे लक्ष वेधताच, पोलिस प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. मंगळवेढा पोलिसांनी याठिकाणी धडक कारवाई करत ६ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असून, यापुढे ररस्त्यात वाहने लावल्यास थेट गुन्हे दाखल करण्याचा इशारा दिला आहे. रस्त्यावर लहान-मोठी वाहने अस्ताव्यस्त उभी केली जात असल्याने एसटी महामंडळाच्या बससह इतर वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता. याबाबत स्थानिक नागरिक आणि एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी



तक्रारी केल्या होत्या. ही समस्या बातमीच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडल्यानंतर पोलिस यंत्रणा जागी झाली. मंगळवेढा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी या तक्रारीची दखल घेत वाहतूक विभागाला तातडीने कारवाईच्या सूचना दिल्या. या कारवाईमुळे रस्त्याने मोकळा श्वास घेतला असून प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. सदरची कारवाई पोलिस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक विभागाचे पोलिस हवालदार संभाजी यादव, पोलिस कॉन्स्टेबल सूरज साळुंखे, सचिन काळेल आणि ब्रह्मपुरी गावचे पोलिस पाटील प्रशांत पाटील यांनी यशस्वीरित्या पार पाडली. वाहतूक शाखेच्या पथकाने ब्रह्मपुरी ते माचणूर रस्त्यावर धाड टाकली. यावेळी रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या ६ वाहनांवर ई-चलन मशीनद्वारे ४,५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. केवळ दंड आकारून न थांबता, पोलिसांनी संबंधित वाहन चालक आणि मालकांना कडक शब्दांत तंबी दिली आहे. यापुढे जर रस्त्यावर वाहने लावलेली आढळली, तर केवळ दंड नाही तर थेट कायदेशीर गुन्हे दाखल केले जातील, अशा स्पष्ट सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.


## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग,**

**राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड (प), मुंबई – ४०० ०८०**

ई मेल पत्ता ः -elnorthmumbai.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्रमांक ः - ०२२-२५६०१३२७

**ई-निविदा सुचना क्र.११/२०२६-२७**

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड,मुंबई हे महाराष्ट्र शासनाकडील विद्युत ठेकेदार लिफाफा क्र.१ अनुसार यांचे कडून खालील कामाकरिता ब-१ टक्के दर नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे online मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी/अधिक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| कामाचे नांव | निविदा रक्कम रुपये : |
|---|---|
| १. अंदाजपत्रक क्र. २४१०१६/२०२५-२६ कामाचे नाव:- नवीन महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील स्थापित अग्निशमन यंत्रणा आणि ॲड्रेसेबल फायर अलार्म सिस्टीमसाठी तीन वर्षांसाठी अर्धसमावेशक वार्षिक देखभाल करार करणे. (दुसरी मागणी) | रुपये ३६८५१२८ /- |
| २. अंदाजपत्रक क्र. २४२००९/२०२५-२६ जुने महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील स्थापित स्प्लिट एसी, विंडो एसी आणि कॅसेट एसी साठी सर्वसमावेशक वार्षिक देखभाल करार करणे(कालावधी : १ वर्ष)(दुसरी मागणी) | रुपये ९७९९०० /- |
| ३. अंदाजपत्रक क्र. २४२००७/२०२५-२६ जुने महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील स्थापित असलेल्या उद्वाहनांना (२ थायसेन कृप व १ इंडोफुजी मेक) सर्व समावेशक वार्षिक देखभाल करार करणे.( कालावधी: 3 वर्ष) (तीसरी मागणी) | रुपये १७४९३२४ /- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी ः दि.१५.०५.२०२६ ते दि २३.०५.२०२६ रोजी १७.३०वा.पर्यत.

ई निविदा उघडणे ः दि.२५.०५.२०२६ रोजी १४.00 वा.नंतर.

(महाराष्ट्र शासन ,सा.बां विभाग ,मंत्रालय मुंबई यांचे पत्र संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०४/इमा-२ दि.१४.०२.२०२५)

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्धआहे.

१.वरील अंदाजित रक्कमेत जी.एस..टी. सामाविष्ट नसून ठेकेदाराने निविदेत दर भरताना जी.एस..टी.वगळून दर नमूद करावा.अंदाजित रक्कमेवर नमूद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस..टी.१८% वेगळा अदा करण्यात येईल.

२.http://mahatenders.gov.in

(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)

३. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफीकेशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.

४. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग,( मुलूंड) मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.काअ/उमुंविवि/निविदा/९५४८/२०२६ दिनांकः १२/०५/२०२६

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग मुंबई.

सही
कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग मुंबई.

आरओसी - 2025-26/क्र- 5/C८००

# वैद्यकीय संस्थांच्या इमारतींसाठी ५०% सवलत; 'सिंधुरत्न' योजनेला मुदतवाढ

**नाशिक (भावना जैन) :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारची मंत्रिमंडळाच्या बैठकीत तब्बल १४ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यावेळी वैद्यकीय संस्थांच्या इमारतींसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसारमध्ये सुधारणा करण्यात येणार असल्याची माहिती आहे. तसेच यापुर्वी मिळणाऱ्या २५ टक्क्यांच्या सवलतीत आता ५० टक्क्यांपर्यंत वाढही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



**मंत्रिमंडळ बैठकीतील प्रमुख निर्णय**

पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयांतील गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्यासाठी सुधारित धोरण मंजूर करण्यात आले. सहा मोठ्या प्रकल्पांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर गाळ काढण्यात येणार असून, त्यामुळे पाणीसाठा वाढण्यास मदत होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होणार असून धरणांचे संवर्धनही होणार आहे.

१. नाशिक जिल्ह्यातील अंबोली-वेळुंजे प्रवाही वळण योजना प्रकल्पासाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली.

२. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी "सिंधुरत्न समृद्ध योजना २.०" आणखी तीन वर्षे राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या प्रभावी नियोजनातून जिल्ह्यांचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर दिला जाणार आहे.

३. राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी वय, शैक्षणिक पात्रता आणि परीक्षेतील सवलतींचा लाभ घेतल्यास त्यांची नियुक्ती राखीव प्रवर्गातूनच केली जाणार आहे. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा करता येणार नाही.

४. विजाभज प्रवर्गातील खाजगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील शिक्षकांना १२ आणि २४ वर्षांच्या सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवडश्रेणी लागू करण्यास मंजुरी देण्यात आली.

५. कुसुमाग्रज प्रतिष्ठान या संस्थेला दरवर्षी १० लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

६. नाशिक रिंग रोड प्रकल्पासाठी आवश्यक जमीन खरेदीवरील मुद्रांक शुल्कात सवलत देण्यास मान्यता देण्यात आली.

७. मृद व जलसंधारण विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला असून राज्यात एकूण ८ हजार ७६७ पदांना मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये सुमारे २ हजार २८४ नवीन पदांची वाढ करण्यात आली आहे.

८. पुणे महापालिकेच्या मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी तीन शासकीय जमिनी विनामूल्य हस्तांतरित करण्यास मंजुरी देण्यात आली. संगमवाडी पूल ते बंडगार्डन पूल परिसरातील नदीपात्र आणि संबंधित जागा प्रकल्पासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

९. रितानंद बालवेध एज्युकेशन फाऊंडेशन ला पनवेल तालुक्यातील भाताण येथील जमीन देण्यास मंजुरी देण्यात आली.

१०. बांग्लादेशला निर्यात होणाऱ्या संत्र्यांसाठी दिली जाणारी आयात शुल्क परतावा योजना बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेचा राज्यातील शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ होत नसल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.


# दंड न भरल्यास जप्त वाहनांचा होणार लिलाव! वसई RTOचा मोठा निर्णय

**विरार (रघुनाथ कदम) :** वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी वायुवेग पथकाने जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव करण्याचा निर्णय प्रादेशिक परिवहन विभागाने घेतला आहे. त्यामुळे संबंधित वाहनमालकांनी लिलाव प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी थकीत कर किंवा दंडात्मक रक्कम भरून आपली वाहने ताब्यात घ्यावीत, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय वसई तर्फे करण्यात आले आहे. वसई-विरार शहरात वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने विशेष वायुवेग पथकाची नियुक्ती केली आहे. हे पथक वाहन तपासणी, योग्यता प्रमाणपत्र, परवाना आणि विमा नसलेल्या वाहनांवर कारवाई, क्षमतेपेक्षा अधिक भार वाहून नेणाऱ्या वाहनांवर दंड, तसेच अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसेसवर धडक मोहीम अशा विविध प्रकारच्या कारवाया करत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांकडून दंडात्मक कारवाई करून महसूल वसूल करण्याचे कामही या पथकाद्वारे केले जाते. या मोहिमेदरम्यान अनेक वाहने जप्त करण्यात आली होती. संबंधित वाहनधारकांनी



दंडात्मक रक्कम किंवा थकीत कर भरून ही वाहने सोडवून नेणे अपेक्षित होते. मात्र, अनेक वाहनमालकांनी अद्याप वाहने ताब्यात घेतली नसल्याने आता या वाहनांचा लिलाव करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सोनाली सोनार यांनी वाहनमालकांना आवाहन करत सांगितले की, लिलाव प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी संबंधितांनी थकीत कर किंवा दंड भरून आपली वाहने सोडवून घ्यावीत. अन्यथा नियमानुसार जप्त वाहनांचा लिलाव करण्यात येईल. परिवहन विभागाच्या या निर्णयामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई होण्याचे संकेत मिळत आहेत.

# पुणेकरांसाठी खास पर्वणी! तीन दिवस फ्रीमध्ये पाहता येणार मराठी सिनेमे




**पुणे (अकिल शेख) :** पुण्यातील मराठी सिनेरसिकांसाठी खास आनंदाची बातमी आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील वैविध्यपूर्ण कथा, नव्या विचारांची मांडणी आणि सर्जनशीलतेचा उत्सव साजरा करणारा लोकप्रिय मराठी फिल्म फेस्टिव्हल यंदा पुन्हा एकदा पुण्यात रंगणार आहे. Red FM आयोजित या महोत्सवाचे सहावे पर्व २२ ते २४ मे २०२६ दरम्यान E-Square येथे पार पडणार असून, हा फेस्टिव्हल प्रेक्षकांसाठी पूर्णपणे विनामूल्य खुला असणार आहे. यंदाच्या महोत्सवात समकालीन चित्रपटांसोबतच जैत रे जैत, तिघी, गोंधळ आणि दशावतार यांसारख्या अजरामर क्लासिक चित्रपटांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. गेल्या पाच पर्वांमध्ये या महोत्सवाने मराठी चित्रपटप्रेमींमध्ये वेगळे स्थान निर्माण केले असून, मराठी सिनेमाचा समृद्ध वारसा आणि प्रादेशिक कथनशैलीतील नव्या प्रयोगांना व्यासपीठ देणारा महत्त्वाचा सिनेमोत्सव म्हणून त्याची ओळख निर्माण झाली आहे. या महोत्सवात विविध पॅनल डिस्कशन्स, दिग्दर्शक आणि कलाकारांशी संवाद तसेच प्रादेशिक कथाकथनाच्या बदलत्या प्रवाहांवर विशेष चर्चासत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. महेश मांजरेकर, अमृता सुभाष, गिरीश कुलकर्णी, शिवराज वायचळ आणि सिद्धार्थ जाधव यांच्यासह मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकारांची उपस्थिती यावेळी लाभणार आहे. महोत्सवातील विशेष आकर्षण म्हणजे ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना प्रदान करण्यात येणारा 'लाईफटाईम अचिव्हमेंट अवॉर्ड'. मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील त्यांच्या पाच दशकांहून अधिक काळाच्या योगदानाचा गौरव या निमित्ताने करण्यात येणार आहे. नवोदित दिग्दर्शक आणि कथाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी शॉर्ट फिल्म स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले असून, त्यासाठी फिल्म क्रिटिक्स गिल्ड आणि प्रसिद्ध चित्रपट समीक्षक अनुपमा चोप्रा यांचे सहकार्य लाभले आहे.

# सोशल मीडियावरील बदनामीला लागणार लगाम

## कायदे कडक करण्यासाठी नवी समिती स्थापन

**पुणे (अभिजीत येरल्लू) :** सोशल मीडियावरून कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय एखाद्या व्यक्तींची बदनामी करण्याच्या वाढत्या घटनांची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून, या बदनामीला लगाम लावण्यासाठी कडक धोरण स्विकारले आहे. हे रोखण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली असून, या समितीचे अध्यक्ष म्हणून पोलिस महासंचालक असणार आहेत. सोशल मीडियावरील बदनामी, दिशाभूल करणारे मजकूर आणि गैरवापर रोखण्यासाठी विद्यमान कायद्यात सुधारणा करणे अथवा स्वतंत्र कायदा तयार करण्याच्या शक्यतेचा अभ्यास ही समिती करणार आहे. तंत्रज्ञान आणि आधुनिक युगात प्रत्येकजन सोशल मिडीयावर आहे. पण, त्याचा अतिरेक देखील पाहिला मिळत आहे. फेसबुक, एक्स (ट्विटर), इंस्टाग्राम आणि व्हॉट्सअॅपसारख्या सोशल मीडियावरून वैयक्तिक तसेच सामाजिक स्तरावर बदनामीकारक पोस्ट, अफवा आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित होत आहे. या घटनांमध्ये वाढ होत असल्याची नोंद शासनाने घेतली आहे. विशेषतः आयटी अॅक्टमधील कलम ६६-अ रद्द झाल्यानंतर अशा प्रकरणांमध्ये प्रभावी कारवाई करताना अनेक कायदेशीर अडचणी निर्माण होत असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अधिक सक्षम आणि प्रभावी कायदेशीर चौकट उभी करण्याच्या दृष्टीने अभ्यास सुरू केला आहे. शासन निर्णय जारी झाल्यानंतर पुढील ३



महिन्यांच्या आत समितीला आपला सविस्तर अहवाल गृह विभागाकडे सादर करावा लागणार आहे. या अहवालाच्या आधारे सोशल मीडियावरील बदनामीकारक व दिशाभूल करणाऱ्या प्रकारांवर कठोर कारवाई करण्यासाठी नवीन उपाययोजना लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अफवा व बदनामीकारक पोस्ट करणाऱ्यांवर लगाम लागणार आहे. सोशल मीडियावरील बदनामी रोखण्यास आवश्यक कायदेशीर सुधारणा सुचवणे, स्वतंत्र राज्यस्तरीय कायद्याची आवश्यकता तपासणे, सर्वोच्च न्यायालयाने श्रेया सिंघल व पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज प्रकरणांत दिलेल्या निर्देशांचा अभ्यास करणे, तसेच तांत्रिक आणि कायदेशीर बाबींची पडताळणी करणे अशी महत्त्वाची आव्हाने असणार आहेत. विशेषतः महिला व प्रतिष्ठित व्यक्तींविरोधातील बदनामीच्या घटनांमध्ये तातडीने आणि प्रभावी कारवाई करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

समितीची रचना- महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक हे समितीचे अध्यक्ष असतील. समितीत विधी व न्याय विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग तसेच महिला व बाल विकास विभागाच्या प्रधान सचिवांचा समावेश केला असून, सायबर विभागाचे अपर पोलिस महासंचालक सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. गरजेनुसार विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना समितीच्या बैठकीसाठी निमंत्रित करण्याचा अधिकारही समितीला देण्यात आला आहे.

# पुणे–सातारा वेस्टर्न बायपाससाठी तब्बल ६ हजार कोटींचा महाआराखडा सज्ज!

**सातारा (महेश पानसरे) :** पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीवर कायमचा इलाज करण्याचे धोरण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्यावतीने हाती घेण्यात आले आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवारी खंबाटकी घाटासह पुण्यातील नवले ब्रिजची पाहणी करत असताना वाहतूक कोंडीच्या व वारंवार होणाऱ्या अपघातांची माहिती घेतली. विशेषत: पुणे ते सातारा या अंतरातील प्रवास एक तासावर आणण्यासाठी सहा हजार कोटी रुपयांचा डीपीआर तयार केला आहे. या डीपीआरमध्ये अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत, असे ना. गडकरी यांनी सांगितले. पुणे शहरातच मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होवून प्रवाशांचा वेळ जातो. या परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आणि राष्ट्रीय महामार्ग अधिक सुरक्षित व वेगवान करण्यासाठी केंद्र सरकार आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. पुणे-नगर महामार्ग, पुणे-सातारा मार्ग, वेस्टर्न बायपास, सेवा रस्ते, फ्लायओव्हर्स, ट्रक पार्किंग, अतिक्रमण हटाव आणि वन्यजीव संरक्षण अशा विविध स्तरांवर तब्बल हजारो कोटी रुपयांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. पुणे-सातारा मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी पुण्यात नव्याने फ्लायओव्हर्स बहुपदरी स्वरूपात उभारले जाणार असून शहरातील प्रमुख चौकांमधील प्रवास वेळेत मोठी बचत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. छत्रपती संभाजीनगर ते सातारा दरम्यान थेट जाणाऱ्या महामार्गाचे




काम एकत्रित नसले तरी हा प्रवास छ. संभाजीनगर ते पुणे व पुणे ते सातारा एनएच ४८ मार्गे होतो. पुणे ते सातारा रस्त्याचे काम आणि पुणे ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान नवीन ग्रीनफिल्ड एक्स्प्रेस-वे चे काम वेगाने सुरू आहे. नवीन मार्गामुळे संभाजीनगर ते पुणे प्रवास अवघ्या २ तास १५ मिनिटांत पूर्ण होणे शक्य होणार आहे. पहिल्या टप्प्यात खराडी ते शिरूर दरम्यान उन्नत महामार्ग आणि दुसऱ्या टप्प्यात शिरूर ते थेट समृद्धी महामार्गापर्यंत १९२ किलोमीटरचा नवीन ग्रीनफिल्ड एक्स्प्रेस-वे बांधण्यात येत आहे. तसेच सातारा ते पुणे रस्त्याच्या नवीन डीपीआरमुळे हा प्रवास १ तासात होऊ शकतो. त्यामुळे छ. संभाजीनगर ते सातारा या प्रवासासाठी सव्वातीन ते साडेतीन तास एवढा कमी कालावधी लागेल, असा अंदाज ना. नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे. पुणे-सातारा वेस्टर्न बायपास प्रकल्पासाठी तब्बल ६ हजार कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे पुणे शहरातील जड वाहतूक बाहेरून वळवण्यास मदत होणार आहे. नव्याने १४० किलो मीटर अंतराचा नवीन डीपीआर तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील वाढती वाहनसंख्या लक्षात घेऊन या मार्गावरही स्वतंत्र फ्लायओव्हर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खंडाळा, शिरवळ आणि इतर वाहतूक कोंडीच्या ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याचे नियोजन सुरू आहे. विशेषतः औद्योगिक वाहतूक आणि मालवाहतूक ट्रकांमुळे निर्माण होणारी गर्दी कमी करण्यासाठी हे फ्लायओव्हर्स महत्त्वाचे ठरणार आहेत.

# तमिळनाडूच्या नव्या मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर

## मुख्यमंत्री विजय यांच्याकडे गृह खाते

**वृत्तसंस्था :** तमिळनाडूमधील नवनिर्वाचित मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या शिफारशीनुसार राज्यपाल विश्वनाथ आर्लेकर यांनी नवीन मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर केले आहे. शनिवारी, १६ मे २०२६ रोजी लोकभवनाने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत यादीनुसार मुख्यमंत्री विजय यांनी गृह, सामान्य प्रशासन, पोलीस तसेच महिला आणि युवा कल्याण यांसारखी महत्त्वाची खाती स्वतःकडे ठेवली आहेत. नव्या मंत्रिमंडळात एकूण १० मंत्र्यांना विविध खात्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. एन. आनंद यांच्याकडे ग्रामीण विकास आणि जलसंपदा खाते सोपवण्यात आले असून, आधव अर्जुन सार्वजनिक बांधकाम आणि क्रीडा विकास विभाग सांभाळणार आहेत. तसेच के. ए. सेंगोत्तैयन यांच्याकडे वित्त खाते, तर के. जी. अरुणराज यांच्याकडे आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. याशिवाय पी. वेंकटरामनन अन्न व नागरी पुरवठा खाते पाहणार असून, आर. निर्मलकुमार यांच्याकडे ऊर्जा आणि कायदा खाते सोपवण्यात आले आहे. दरम्यान,



मंत्रिमंडळाच्या खातेवाटपाच्या दोन दिवस आधीच राज्य सरकारने पोलीस विभागात मोठा प्रशासकीय फेरबदल केला आहे. गुरुवारी, १४ मे २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या सरकारी आदेशानुसार गुप्तचर शाखेसह विविध विभागांतील १० हून अधिक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. गुप्तचर शाखेच्या पोलीस महासंचालक बी. बाला नागा देवी यांची चेन्नई येथील सायबर गुन्हे शाखेच्या डीजीपीपदी बदली करण्यात आली आहे. तसेच राजीव कुमार यांची पोलीस महासंचालक (प्रशिक्षण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नव्या सरकारच्या स्थापनेनंतर प्रशासन आणि पोलीस यंत्रणेत वेगाने बदल करण्यात येत असल्याचे या निर्णयांवरून स्पष्ट होत आहे.

# मेट्रो थेट वसई–विरारपर्यंत विस्तारणार

## MMRDA कडून सुधारित प्रस्ताव सादर!

**विरार (सुचिता देशमुख) :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने मिरा-भाईंदर ते विरार मेट्रो कॉरिडोरचा सुधारित प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला असून, या प्रकल्पामुळे विरार-वसई परिसराला मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबई आणि उपनगरांमध्ये मेट्रोचे जाळे वेगाने विस्तारत असताना आता हा विस्तार थेट विरारपर्यंत पोहोचणार आहे. याआधी मेट्रो-१३ मार्ग शिवाजी चौक ते विरार असा प्रस्तावित होता, मात्र नवीन आराखड्यानुसार हा मार्ग भाईंदर ते विरारमधील डोंगरपाडा असा करण्यात आला आहे. नवीन संरेखनामुळे प्रकल्पाचा खर्च वाढला असून, तो सुमारे ६,९०० कोटी रुपयांवरून ७,२४० कोटी रुपयांपर्यंत गेला असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. भाईंदर येथे सुभाषचंद्र बोस मैदान हे या मार्गाचे प्रारंभिक स्थानक असणार असून, सध्या सुरू असलेल्या मेट्रो-९ मार्गाशी येथे इंटरचेंज सुविधा उपलब्ध होणार आहे. हा नवीन मेट्रो मार्ग



सुमारे २४.९ किलोमीटर लांबीचा असणार असून, त्यामध्ये एकूण १७ स्थानकांचा समावेश असेल. यापैकी १४ स्थानके उन्नत (Elevated) तर ३ स्थानके भुयारी (Underground) असतील. वसई ते नालासोपारा दरम्यान ३.२५ किमीचा भुयारी मार्ग तयार करण्यात येणार आहे. या मार्गावरील प्रमुख स्थानकांमध्ये सुभाषचंद्र मैदान, नायगाव, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जुचंद्र, राजवली, गोलाणी नाका, वसई, वसई-विरार महापालिका अग्निशमन केंद्र, आचोळे गाव, नालासोपारा पूर्व, नालासोपारा पश्चिम, मोरया नगर, यशवंत नगर, विरार, विवा कॉलेज, याझू पार्क आणि डोंगरपाडा यांचा समावेश आहे. विरारमधील नारिंगी क्रिकेट ग्राउंडजवळ कार डेपो उभारण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे मिरा-भाईंदर, वसई आणि विरार परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून, प्रवाशांचा प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होणार आहे.

# युरियाचा काळाबाजार रोखण्यासाठी ठाण्यात विशेष चेकनाके!

**ठाणे (तृप्ती गोरे) :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात युरिया खताचा काळाबाजार, अवैध साठेबाजी आणि बेकायदेशीर वाहतूक रोखण्यासाठी कृषी विभाग आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्याच्या सीमेलगतच्या प्रमुख मार्गांवर विशेष चेकनाके उभारण्यात येणार असून, संशयित वाहनांची तपासणी केली जाणार आहे. शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि योग्य दरात खत उपलब्ध व्हावे तसेच कृषी उपयोगासाठी असलेले निमकोटेड युरिया खत औद्योगिक वापरासाठी वळवले जाणार नाही, यासाठी प्रशासनाने कडक उपाययोजना सुरू केल्या आहेत. काही ठिकाणी युरिया




खताची अवैध साठेबाजी, परराज्यात किंवा इतर जिल्ह्यांत बेकायदेशीर वाहतूक, जादा दराने विक्री आणि अनधिकृत वितरण होत असल्याच्या तक्रारी समोर आल्यानंतर ही मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. जिल्ह्यात सध्या खरीप हंगामासाठी पुरेसा खतसाठा उपलब्ध असला तरी कृत्रिम टंचाई निर्माण करून काळाबाजार करण्याचा प्रयत्न होऊ नये, यासाठी प्रशासन विशेष दक्षता घेत आहे. या विशेष कारवाईदरम्यान कृषी विभाग आणि पोलीस प्रशासनाचे अधिकारी संयुक्तपणे वाहनांची तपासणी करणार आहेत. युरिया खत वाहतूक करणाऱ्या वाहनांची कागदपत्रे, परवाने, बिले आणि साठ्याची पडताळणी केली जाणार असून, कोणत्याही वाहनात मोठ्या प्रमाणात युरिया खत आढळल्यास त्याची सखोल चौकशी करण्यात येईल. नियमभंग किंवा अनियमितता आढळल्यास संबंधितांवर तत्काळ कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. कृषी विकास अधिकारी मुनीर बचोटिकर यांनी सांगितले की, "शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य दरात खत उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. युरिया खताचा काळाबाजार, अवैध वाहतूक किंवा साठेबाजी करणाऱ्यांवर कोणतीही दया दाखवली जाणार नाही." प्रशासनाने शेतकऱ्यांना अधिकृत परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खत खरेदी करण्याचे आवाहन केले असून, जादा दराने विक्री किंवा संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.